**सुविचार**

दो बातें हैं – कर्म तथा कर्म का प्रभाव। कर्म भले ही साधारण हो परन्तु इसका प्रभाव सकारात्मक, उत्पादक व रचनात्मक होना चाहिए।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक **यशवंत**

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ शुक्रवार दि. १९ जूलै २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१५४ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

# योजनांच्या अमंलबजावणीत काटेकोरपणा हवा : मुख्यमंत्री

मुंबई : शासन गोरगरीब, सर्वसामान्यांना लाभ मिळावा यासाठी योजना राबवत असते. अशा घटकांकडून पैसे काढणे हे योग्य नाही, त्यामुळे योजनांच्या अमंलबजावणीत गैरप्रकार झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही असा कठोर इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या नाव नोंदणीसाठी अनेक ठिकाणी पैशांची मागणी करण्यात येत असल्याचे प्रकार समोर आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी हा इशारा दिला. योजनेच्या अंमलबजावणीत काठेकोरपणा हवा असे स्पष्ट केले.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या सात महत्वाकांक्षी योजनांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा घेण्यात आला. या बैठकीस जिल्हास्तरीय विविध यंत्रणांचे अधिकाऱ्यांसह, संबंधित जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, विभागीय आयुक्त आदी उपस्थित होते. तसेच वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्य सचिवांसह विविध विभांगांचे सचिवस्तरीय अधिकारी उपस्थित होते.

कुणी पैसे मागत असेल तर त्याला तुरुंगात टाका

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, योजनांच्या अमंलबजावणीत गैरप्रकार होऊ नये याची दक्षता घ्या. जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्तांनी यासाठी दक्ष राहिले पाहिजे. योजनांच्या अंमलबजावणीचे उद्दीष्ट साध्य करताना लाभार्थ्यांची नोंदणी करताना काही घटक गैरप्रकार करत असतील तर त्यांना वेळीच रोखले पाहिजे. विशेषतः मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत कुणी महिला भगिनींकडून अर्जासाठी पैशांची मागणी केल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करा. अशांना केवळ निलंबित करून नका, तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा. त्याला तुरुंगात पाठवा. या योजनेत भगिनींना कुणीही नडता कामा नये याकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवले पाहिजे. या नोंदणीचा सातत्याने आढावा घेतला जाणे आवश्यक आहे.

महत्वाच्या अशा या सर्वच योजनांमध्ये केवळ **(पान ७ वर)**

# जागावाटपावरून दोन्ही आघाड्यांची डोकेदुखी वाढणार

मुंबई : लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडी आणि महायुतीतले जागावाटप शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होतं. महाविकास आघाडीत ठाकरेंच्या शिवसेनेने सर्वाधिक जागांवर दावा सांगून काँग्रेसच्याही काही जागा पळवल्या. सांगली, दक्षिण मध्य मुंबई या जागांचा वाद शेवटपर्यंत सुरू होता. तर दुसरीकडे शिंदेंच्या शिवसेनेने भाजपाला चर्चेत शेवटपर्यंत गुंतवून ठाणे, नाशिक संभाजीनगर या जागा आपल्याकडे कायम राखल्या. त्यावरून ४८ जागांच्या वाटपासाठी झालेली रस्सीखेच लक्षात घेता विधानसभेच्या २८८ जागांचे वाटप म्हणजे किती डोकेदुखीच असणार आहे याचा साधारणता अंदाज येतो.

मुंबईत ठाकरेंचा जास्त जागांवर दावा

ठाकरेंच्या शिवसेनेने विधानसभेच्या सुमारे सव्वाशे जागा लढवण्यासाठी आत्तापासूनच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. मुंबईतल्या दोन तृतीयांश जागांवर आपला दावाही ठोकला आहे. लोकसभा निवडणुकीत कमी जागा लढवूनही राज्यातला सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या काँग्रेसला हे मान्य होईल असे वाटत नाही.

विदर्भात काँग्रेसचा दावा

शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे मुंबईत फारशे अस्तित्व नसले तरी काँग्रेस एवढ्या मोठ्या प्रमाणात मुंबईतल्या जागा सोडेल याची शक्यता तशी कमीच आहे. अर्थात ठाकरेंनी जसा मुंबईतल्या जागांवर रुमाल टाकून आपला हक्क सांगितलाय तसाच काहीसा प्रकार विदर्भातल्या जागांबाबत काँग्रेसकडून आणि पश्रि्चम महाराष्ट्रातील जागांबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे जागावाटप तेवढे सोपे असणार नाही तिकडे महायुतीतही जागा वाटपाची प्रक्रिया सहज सुलभ असेल असं वाटत नाही. भाजपाने साधारणता १५० ते १६० जागा लढवण्याचे तयारी सुरू केली आहे. तर शिंदेंनी शंभर जागांवर दावा ठोकला आहे. जेवढ्या जागा शिंदेंना मिळतील तेवढ्याच आपल्यालाही मिळाल्या पाहिजेत अशी अजित पवारांच्या राष्ट्रवादीची भूमिका आहे.

महायुतीत जागांचा पेच कसा सुटणार?

या तिघांच्या अपेक्षांची बेरीज केली तर महाराष्ट्रातील विधानसभेचे मतदारसंघ आणखी शंभराने वाढवावे लागतील. याचाच अर्थ २८८ जागांचे वाटप सोपं असणार नाही हाच आहे. २०१९ च्या संख्याबळानुसार जागांचं वाटप करावं असं सूत्र मान्य झालं तरी, २०१४ ला निवडून आलेल्या एकसंघ पक्षाच्या जागा गृहीत धरायच्या की आता शिंदे आणि अजित दादांबरोबर असणाऱ्या आमदार यांची संख्या गृहीत धरायची हा पेच येणारच आहे.

शिंदे-दादांचं समाधान होणार का? जर सध्याचे संख्याबळ लक्षात घेतलं तर भाजपाचे स्वतः चे आणि सहयोगी पक्षाचे ११४ आमदार आहेत. शिंदेंबरोबर आलेले ५० आणि दादांसोबत असलेले ४०, असं २०० जागाच वाटप तर सहजपणे होऊ शकेल. पण उरलेल्या ८५ जागा कशा वाटायच्या हा प्रश्र्न येईलच. त्या जागा संख्याबळानुसार वाटायच्या ठरल्या तर भाजपाला ४०-४२ आणि शिंदे आणि अजित पवारांना मिळून ४० अशा जागा दिल्या जातील. यामुळे भाजपाची बेरीज १५० पर्यंत जाईल. पण शिंदेंना मात्र ७० आणि अजितदादांना ६० जागा मिळू शकतील तेवढ्या जागांवर समाधान होईल का? हा प्रश्न आहे. सध्या तरी त्यांची तशी मनस्थिती असल्याचं दिसत नाही.

# १०० आणा सरकार बनवा


लखनौ - उत्तरप्रदेश भाजपमधील सुंदोपसुंदीच्या पार्श्वभूमीवर सपाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी भाजपमधील असंतुष्टांना थेट मान्सून ऑफर घोषित केली. '१०० आणा, सरकार बनवा' असे थेट आवाहनच त्यांनी केले आहे.

उत्तर प्रदेशमध्ये लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर भाजपमधील अंतर्गत संघर्ष विकोपाला गेला आहे. तसेच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य हे आमने सामने आल्याचे दिसत आहे. त्या पार्श्र्वभूमीवर भाजपा नेते आणि पदाधिका-यांच्या लखनौपासून दिल्लीपर्यंत बैठकांवर बैठका होत आहेत. वेगवेगळे दावे केले जात आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर भाजपमधील या वादाचा फायदा घेण्याचा प्रयत्न विरोधी पक्षांनी सुरू केला आहे. समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही भाजपमधील या सत्तासंघर्षादरम्यान आपली चाल खेळत या असंतुष्टांना मान्सून ऑफर दिली आहे.

'१०० आणा आणि सरकार बनवा' म्हणजेच १०० आमदारांना सोबत घेऊन या आणि समाजवादी पक्षासोबत उत्तर प्रदेशात सरकार बनवा, असे सूचक आवाहन या माध्यमातून अखिलेख यादव यांनी भाजपमधील असंतुष्टांना केले. अखिलेश यादव यांनी ही ऑफर भाजप **(पान ७ वर)**

# जपानने बनविला माणसासारखा 'चीटी' रोबोट!

टोकिओ : जपानच्या शास्त्रज्ञांनी रोबोटिक्सच्या क्षेत्रात एक धाडसी आणि विचार करायला लावणारी यशस्वी चाचणी केली आहे. ही बाब नक्कीच आश्र्चर्यात टाकणारी आहे. टोकियो विद्यापीठातील प्राध्यापक शोजी ताकेउची यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांनी रोबोटच्या चेह-यावर जिवंत मानवी त्वचा यशस्वीरीत्या बसविली आहे. एवढेच नाही तर या त्वचेला स्मित हास्य करण्याचीही यंत्रणादेखील बसवण्यात आली आहे.



या भविष्यातील तंत्रज्ञानाची एक झलक देणा-या या संशोधनामुळे शास्त्रीय कल्पना आणि वास्तविकतेमधील सीमारेषा पुन्हा एकदा धुसर झाल्या आहेत. हे यश मानवी त्वचेचा वापर करून अधिकाधिक वास्तववादी रोबोट बनवण्याच्या दिशेने टाकलेले मोठे पाऊल आहे. याचा फायदा केवळ मनोरंजन क्षेत्रातच नाही तर कॉस्मेटिक्स आणि वैद्यकीय क्षेत्रातही होण्याची शक्यता आहे.

संशोधकांच्या टीमने मानवी चेह-याच्या आकाराची जिवंत त्वचा तयार केली आणि नाजूक स्नायुसदृश यंत्रणा वापरून या त्वचेला मोठे स्मित करण्यासाठी प्रेरित केले. प्रा. ताकेउची यांनी स्पष्ट केले की, या कृत्रिम स्नायू आणि आधारांच्या मदतीने आम्ही प्रथमच **(पान ७ वर)**

# अवघ्या ५ सेकंदात स्वर्गवास घडविणारे मशिन तयार

बर्न : - भारतात २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने इच्छा मरणाला परवानगी दिली. आपला अखेरचा श्वास कधी घ्यावा, हे ठरविण्याचा अधिकार मरणासन्न व्यक्तीला आहे, असे मत यावेळी न्यायालयाने नोंदविले होते. दरम्यान, न्यूयॉर्क पोस्ट वेबसाइटनुसार, स्वित्झर्लंडमध्ये एक सुसाइड पॉड वापरण्याची चर्चा सुरु झाली आहे. ज्याचे नाव सारको आहे, परंतु त्याला 'टेस्ला ऑफ इच्छामरण' म्हटले जात आहे.



जे लोक आजारपणाला कंटाळलेले असतात ते लोक देवाकडे इच्छामरण मागत असतात, अशा लोकांसाठी हे मशीन तयार करण्यात आले आहे. २०१९ मध्ये व्हेनिस डिझाइन फेस्टिव्हलमध्ये या मशीनचे पहिल्यांदा अनावरण करण्यात आले. हा थ्रीडी प्रिंटेड कॅप्सूलचा प्रकार आहे. या मशीनमध्ये बटन दाबताच आतील नायट्रोजनची पातळी झपाट्याने वाढते. अवघ्या ५ सेकंदात व्यक्ती ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे बेशुद्ध पडतो आणि १० मिनिटांतच त्याचा वेदनारहित मृत्यू होतो.


स्वित्झर्लंडची 'द लास्ट रिसॉर्ट' संस्था इच्छामरणाच्या बाजूने आवाज उठवत आहे. या पॉडपासून कोणतेही नुकसान होत नाही, आणि ते सहज वापरता येते, असा या संस्थेचा विश्र्वास आहे. स्वित्झर्लंडमध्ये इच्छामरण कायदेशीर आहे, परंतु स्विस क्रिमिनल कोडच्या कलम ११५ मध्ये असे म्हटले आहे की, आत्महत्येस मदत करणे हा स्वार्थी कारणांसाठी केलेला गुन्हा आहे.

जन्मापेक्षा मृत्यू स्वस्त

ही सेवा लोकांना फक्त २० डॉलर्समध्ये, म्हणजे सुमारे १६०० रुपयांमध्ये दिली जाईल आणि ज्याचे किमान वय ५० वर्षे असेल. जर कोणी १८ वर्षे किंवा त्याहून अधिक वयाचे असेल आणि गंभीरपणे आजारी असेल, तर तो देखील ही सेवा वापरू शकतो. लास्ट रिसॉर्टचे मुख्य कार्यकारी सांगतात की, अनेकांनी या मशीनची मागणी केली आहे, त्यामुळे कदाचित लवकरच ते वापरले जाईल. लास्ट रिसॉर्टच्या सल्लागार मंडळातील वकील, फिओना स्टीवर्ट म्हणतात की, या क्षणी हे ठरवले गेले नाही की पहिला वापरकर्ता कोण असेल आणि मृत्यूचे स्थान काय असेल. हे मशीन केवळ खाजगी मालमत्तेवर, तसेच निर्जन ठिकाणी वापरले जाईल. अनेक लोक त्यावर बंदी घालण्याची मागणी करत आहेत, कारण त्यांच्या मते हे मशीन नैतिकदृष्ट्या योग्य नाही. हे मशीन वापरताना डॉक्टरांची गरज नाही. अशा परिस्थितीत कोणीतरी जाणूनबुजून कोणाचा खून करू शकतो, असा प्रश्र्नही लोक उपस्थित करत आहेत.

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात भूकंप वैज्ञानिक वेधशाळा होणार

छत्रपती संभाजीनगर : मराठवाडा विभागासाठी कायमस्वरूपी भूकंप वैज्ञानिक वेधशाळा उभारण्यात येणार असून केंद्र शासनाच्या पृथ्वी व विज्ञान मंत्रालयाने यासाठी जिल्हा प्रशासनाकडे तळमजल्यावर १२ फूट बाय १० फूट आकाराची जागा मागितली आहे. वाहनांच्या वर्दळीपासून शांत अशा ठिकाणी ही जागा मिळावी, यासाठी नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीचे (एनएससी) शास्त्रज्ञ रविकांत सिंह यांनी जिल्हा प्रशासनाला नुकतेच पत्र पाठविले आहे. ट्रॅफिक, हाय-टेन्शन पॉवर लाइन्स, रेल्वे ट्रॅक, जड उद्योग युनिट्स, पॉवर जनरेटर नसलेली जागा उपलब्ध करून देण्याची मागणी प्रशासनाकडे पत्रातून करण्यात आली आहे.



नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी ही केंद्र शासनाची नोडल एजन्सी असून देशभरात भूकंपाच्या धक्क्यांचे चोवीस तास निरीक्षण करते. शास्त्रीयदृष्ट्या भूकंपाचा शोध घेण्यासाठी महाराष्ट्रात मोक्याच्या ठिकाणी चार मानवरहित भूकंप वैज्ञानिक वेधशाळा स्थापन करण्याची योजना एनएससीने आखली आहे; त्यापैकी एक वेधशाळा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. भूकंपविषयक वेधशाळा उभारण्यासाठी तांत्रिक आवश्यकतांमध्ये **(पान ७ वर)**

# 'मारुती महाराज'च्या मिल रोलरचे पूजन




**औसा/ प्रतिनिधी-** तालुक्यातील बेलकुंड येथील संत शिरोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्यात येत्या हंगामासाठी मिल रोलरचे पूजन माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते बुधवारी (दि.१७) आषाढी एकादशीदिनी करण्यात आले.

यावेळी माजी आमदार ॲड. त्रिंबक भिसे, जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष ॲड. श्रीपतराव काकडे, कारखान्याचे अध्यक्ष श्याम भोसले, उपाध्यक्ष सचिन पाटील, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष श्रीशैल उटगे, यशवंत पाटील, अनंत देशमुख, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, माजी संचालक संभाजी सूळ, सचिन दाताळ, गणपत बाजुगळे, ॲड. बाबासाहेब गायकवाड, श्यामराव साळुंके, अमित माने, विलास काळे, सुभाष जाधव, संतोष भोसले, अनिल पाटील, गोविंद सोनटक्के, रमेश वळके, शिवाजी बिराजदार, चंद्रसेन पाटील, भरत माळी, कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री देशमुख यांनी येणाऱ्या हंगामातील पूर्व कामकाजाचा आढावा घेतला. कार्यक्षेत्रातील ऊस उपलब्धतेचा आढावा घेऊन कामाबाबत समाधान व्यक्त केले. हंगाम वेळेत सुरू करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

## अग्नीवीरांना १० टक्के आरक्षण

चंदीगड : हरियाणा सरकारने अग्निवीरांच्या बाबत मोठा निर्णय घेतला आहे. हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी अग्निवीर योजनेबाबत मोठी घोषणा केली. हरियाणा सरकार पोलिस भरती आणि खाण रक्षक (मायनिंग गार्ड) भरतीमध्ये अग्निवीरांना १० टक्के आरक्षण देईल असे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी सांगितले.

केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (सीआयएसएफ), सीमा सुरक्षा दल (बीएसएफ), रेल्वे सुरक्षा दल (आरपीएफ) या केंद्रीय दलांच्या भरतीत माजी अग्निवीरांसाठी १० टक्के आरक्षण ठेवण्यात येणार आहे. हरियाणा सरकारने अग्निवीर जवानांना **(पान ७ वर)**



**राजश्री शाहू महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.अनिरुद्ध जाधव यांच्या निवासस्थानी डॉ. अर्चना पाटील चाकूरकर यांनी सदिच्छा भेट घेतली. या वेळी राजश्री शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव गव्हाणे व परिवारातील सदस्य उपस्थित होते.**

# लोकसभेनंतर काँग्रेसची विधानसभेची तयारी सुरू

**लातूर / प्रतिनिधी-** लोकसभा निवडणुकीतील यशानंतर काँग्रेसकडून विधानसभेची तयारी सुरू करण्यात आली आहे. जिल्हा काँग्रेसच्यावतीने १९ जुलै ते ९ ऑगस्टपर्यंत काँग्रेस भवन येथे विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या जिल्ह्यातील उमेदवारांकडून अर्ज स्विकारले जाणार आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला घवघवीत यश मिळाले. या निवडणुकीत माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार अमित देशमुख व लातूर ग्रामीणचे आमदार धीरज देशमुख यांच्या सूक्ष्म नियोजनातून तसेच काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांचा विजय झाला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने कंबर कसली आहे. जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या इच्छुक उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यास शुक्रवारपासून सुरूवात होणार आहे. यासाठी काँग्रेसने प्रवीण सूर्यवंशी, प्रा. ओमप्रकाश झुरूळे व ॲड. देविदास बोरूळे यांची नियुक्ती केली आहे. सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत काँग्रेस भवनात सदरील अर्ज स्विकारतील. इच्छुकांनी आपले मागणी अर्ज दाखल करावेत. प्रदेश काँग्रेसकडे त्या अर्जांची माहिती सादर करण्यात येईल, अशी माहिती काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्रीशैल उटगे व शहराध्यक्ष ॲड. किरण जाधव यांनी दिली आहे.

द्वितीय पुण्यस्मरण

तत्त्वदर्शी प्रज्ञावंत कवयित्री व लेखिका

**वै. सौ. उर्मिला वि. कराड**

थोर शिक्षणतज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा.कराड यांच्या सुविद्य पत्नी

माईर्स एमआयटी परिवाराच्या वात्सल्यमूर्ती



*फुललेला संसार....*

*भरला संसार हा माझा पाखरांची किलबिल*
*हास्यपुष्पांच्या कळ्यांची अंगणात पखरण*
*सुवासिक सुगन्धाची माझ्या दारी दरवळ*
*बाल निष्पाप जीवांच्या मूक भावांचे संगीत*

*अशा सुखद घरात जीव वेडा विहरतो*
*मातृवत्सल भावांनी माझे मन रिझवितो*
*वात्सल्याच्या संगीताने मातृत्वाला जागवितो*
*अंगाईच्या सुरातच सुख सारे साठवितो.*

-उमा

शब्दाई प्रकाशन आयोजित

**मा. उर्मिला वि. कराड** लिखित

*कृतज्ञ मी कृतार्थ मी, कीर्तनपुष्प, समीर*

या पुस्तकांचा

**|| प्रकाशन समारंभ ||**

हस्ते
**डॉ. श्रीपाल सबनीस**
सुप्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत

अध्यक्ष
**मा. उल्हासदादा पवार**
ज्येष्ठ अभ्यासक

प्रमुख उपस्थिती

**प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड**
संस्थापक-अध्यक्ष,
माईर्स एमआयटी विश्व शांती विद्यापीठ, पुणे, भारत
निर्माते - विश्व शांती घुमट

**प्रा. इंद्रजित भालेराव**
सुप्रसिद्ध कवी,
लेखक

**डॉ. माधवी वैद्य**
ज्येष्ठ लेखिका,
कवयित्री

स्थळ
**संत ज्ञानेश्वर सभागृह**
एम.आय.टी.वर्ल्डपीस युनिव्हर्सिटी, कोथरूड, पुणे । शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सकाळी १०.३० वा.

याप्रसंगी
जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचे वंशज
**ह. भ. प. श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर,**
मु.पो. देहूगांव, पुणे यांचे सुश्राव्य कीर्तन शनिवार, दि. २० जुलै २०२४ रोजी, सायं. ५.१५ वाजता होईल व त्यानंतर महाप्रसाद दिला जाईल.

कार्यक्रम स्थळ : ज्ञानमंदिर, प्लॉट नं. १९, राजपथ को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, रामकृष्ण परमहंस नगर, पौड रोड,कोथरूड, पुणे-४११०३८

आपले विनित : **समस्त कराड परिवार**

दैनिक
यशवंत
शुक्रवार दि.१९ जुलै २०२४

अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

# प्लास्टिकचा अतिवापर पृथ्वी व सर्वच प्राणीमात्रांसाठी अतिघातक- डॉ. जीवन गंगणे

अहमदपूर दि.१८(बालाजी कारामुंगीकर)ः प्लास्टिकचा अतिवापर पृथ्वी व सर्वच प्राणीमात्रांसाठी अतिघातक-असल्याचे प्रतिपादन डॉ. जीवन गंगणे यांनी केले.

पृथ्वी लाखमोलाची आहे तिची आपण काळजी घ्यायलाच हवी. मात्र आपल्या अति हव्यासामुळे व प्लास्टिकच्या अति वापरामुळे ली नाही तर पृथ्वीचा स्फोट होणार आहे, असे प्रतिपादन डॉ. जीवन गंगणे यांनी केले. ते येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, राष्ट्रीय सेवा योजना, स्वामी विवेकानंद विद्यालय, पर्यावरण मित्र मंडळ, ग्रीन क्लब व यशवंत प्रतिष्ठान राडी तालुका अंबाजोगाई या स्वयंसेवी संस्थेच्या बोलत होते.

डॉ. गंगणे पुढं म्हणाले की, चहा पिण्यासाठी, आईस्क्रीम खाण्यासाठी, जेवणासाठी प्लास्टिक कोटेड कप, प्लेट, चमचे आदींचा वापर न करता पर्यावरण पूरक अशा लाकडी, स्टीलच्या वस्तूंचा वापर वाढवावा.

कचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन करावे. झाडांना खिळे ठोकू केले. त्यांनी विद्यार्थ्यांना सप्रयोग प्लास्टिकच्या दुष्परिणामाची जाणीव करून दिली.

भूगोल विभागाचे डॉ. पुरी एन. एन., स्वामी सर यांनीही पृथ्वी अनमोल असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री डी. जी. भराटे, स्वामी सर, संग्राम पवार सर, नुरर्खा पठाण, सर्व




ती दोलायमान झाली आहे. आपण वेळीच आपल्या गरजा मर्यादित करून प्लास्टिकचा वापर कमी केला नाही तर पृथ्वीवरील जीवन नष्ट होईल. आपण पृथ्वीची काळजी घेत- संयुक्त विद्यमाने दिनांक १६ जुलै २०२४ मंगळवार रोजी स्वामी विवेकानंद विद्यालयात प्लास्टिकचे पर्यावरणावरील व मानवी जीवनावरील घातक परिणाम या विषयावर डॉ. गंगणे नयेत. प्लास्टिकला पर्याय म्हणून कागदी, कापडी पिशव्या, स्टील किंवा चिनी मातीचे कप व शासन मान्यताप्राप्त प्लास्टिकचा वापर करावा व कॅन्सरपासून दूर राहावे, असे आवाहनही त्यांनी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यालयाचे, महाविद्यालयाचे विद्यार्थी पांचाळ माहेश्वरी, फिरदोस शेख, शेख मुस्कान, जिनत शेख, दिपक सूर्यवंशी, खेळाडू यांची उपस्थित होती.

# अंधोरीचे सुपुत्र एकनाथ पांडुरंग कांबळे यांचे दुःखद निधन

अहमदपूर दि.१८ (प्रतिनिधी) येथुन जवळच असलेल्या मौजे अंधोरी येथील सुपुत्र एकनाथ पांडुरंग कांबळे यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, प्रा. पांडुरंग पंढरी कांबळे याचे चुलते (काका), अंधोरीचे सुपूत्र एकनाथ पांडूरंग कांबळे गुरुजी यांचे दि. १७/०७/२०२४ सकाळी ठीक ९:३० च्या दरम्यान दुःखद निधन झाले आहे.



त्यांच्या पश्चात पत्नी, ०२ नातू कुमार ऋषीकेश, रत्नदिप मिलिंद कांबळे, सुन, विवाहित ०३ मुली आयु शोभाताई त्रिबक कांबळे पाचोड, मायाताई विक्रम पंडीत, परभणीकर, छायाताई बाबुराव कांबळे अहमदपूर, जावई बाबूराव उर्फ भुजंग कांबळे तांबटसांगवीकर, पुतने प्रा पांडूरंग कांबळे, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

गुरुजीचा अंत्यविधी बुधवार दि. १७ जुलै २०२४ वार रोजी दुपारी ठिक ४:०० च्या सुमारास अंधोरी ता. अहमदपूर जि लातूर येथे झाला. त्याच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# आत्मचिंतन करायला लावणाऱ्या रचनाच्या कविता

रचनाच्या कविता नेहमीच आत्मचिंतन करायला लावणाऱ्या असतात पैकी अशीच निवडलेली ही कविता.

सकाळी सकाळी
गुलाबजलची बाटली
साफ करण्यासाठी
सवयीनं
लिक्विड सोप ओतलं
प्रत्येक बाटली
साफ करताना वापरतात तसं
अन काळजात चर्रर्र झालं ...
गुलाबाच्या मंद सुगंध
मिटविण्यासाठी
रसायनाचा वापर
अगदी
खूप सारं
प्रेमाच चॅट
डिलीट फॉर एव्हरीवन
किंवा क्लिअर चॅट
केल्यासारखं
गुलाबाचा सुगंध संपूर्णतः
मिटवण्याचा प्रयत्न ...
इतके कृतघ्न आपण
स्वतःचा आत्मा
डिजीटल करून घेताना
नैसर्गिक गुलाबी सुगंध
कायमचा निकालात काढत
सेंद्रियत्व हरवून
आम्ही होतोय
रासायनिक
मुळासकट साफ करत
व्हाईट कॉलर क्लिअर
अन डिजिटल
एका क्लिकवर
माणसा सकट सारंच डिलीट
करत
भावनाशून्य होत ...
करतोय का आम्ही
आमचं जगणं सुकर
की होतोय
दिवसेंदिवस
मनोरूग्ण ...

सध्याचा काळ हा एवढ्या वेगाने धावतोय की बघून उर दडपून जातो . या पंचवीस वर्षांत म्हणजे मोबाईल फोन आल्यानंतर त्याचे मानवी जीवनावर झालेले परिणाम कवयित्री रचनाने अगदी अचूकपणे टिपले आहेत . आपण मुकाटपणे सोसत असलेलं दुखणं कोणीतरी लक्षात आणून देतं तेव्हा त्यातली तीव्रता नव्याने जाणवते . असंच काहीसं ही कविता वाचून जाणवलं. मानवी जीवनाला कृत्रिमता किती भयावह पद्धतीने विळखा घालून बसली आहे .

कुठे गेला तो अस्सल जगण्याचा काळ ? आज सगळंच भासमय झालं आहे . जो तो स्वतःत मग्न झाल्यासारखं वाटतं पण हे तरी खरं आहे का ? तर नाही असंच उत्तर मिळेल . माणूस स्वतःच्याही जवळ नाही . तो दुरावला आहे स्वतःपासून, इतरांपासून . माणूस भासात हरवत चालला आहे. सुखाचे दुःखाचे फक्त भास !! खरोखर आनंदाने उर भरून येणं, किंवा काळजात चर्रर्र होण्याची जी अनुभूती असायची ती आता कमी होत आहे . किंवा ती शिल्लक आहे का अशी ही शंका येते .

फुलांचे आकर्षक ईमोजी, ऋख्रऋ काळात आपण फुलांचा गंध विसरत चाललो आहोत . धो धो कोसळणाऱ्या आभासी पावसाच्या रिळ बघताना विसरून जातो की आपण पावसात चिंब भिजल्याला किती काळ लोटला आहे. फुल्ल मेकप करून तयार केलेले जोडप्यांचे रोमँटीक व्हिडिओ बघत असताना आपल्या जोडीदाराचा चेहरा निरखून कधी बघितला हेही लक्षात राहत नाही .

तीस पस्तीस वर्षांपूर्वीचा तो पत्रांचा काळ . त्यासोबत दुरवरून वाहत येणारा जिव्हाळा , काळजी ते हाती पडल्यावरचा आनंद काही औरच असायचा . आता सगळं अस्पर्शित . भावनारहीत . माणसाच्या हातून जगण्याचा गाभाच निसटून कुठेतरी हरवला आहे. नुसतं फोलफट हातात घेऊन धावत असताना आतली अस्वस्थता लपविण्यासाठी सुखी असल्याचा अभिनय सुरू आहे. अस्वस्थ भवताल बघून मनाची होणारी घालमेल कवयित्रीने सदर कवितेतून मांडली आहे.

आत्मा डिजीटल
करून घेताना..
सेंद्रियत्व हरवून आम्ही होतोय
रासायनिक..

या ओळीतून आजच्या काळाचं वास्तव नेमकेपणानं मांडलं आहे .

प्रेमाचं चॅट
डिलीट फॉर एव्हरीवन
किंवा क्लिअर चॅट केल्यासारखं

या ओळीतून आजच्या मानवी जीवनात घटित स्थित्यंतराची चपखल मांडणी रचनाने केली आहे .

सगळंच मानवी संबंध त्यातल्या भावभावनांतील ओरिजनॅलिटी कुठेतरी हरवत चालली आहे . माणूस म्हणून त्याची पात्रता ही कमी होत आहे . सगळं जगणंच वरवरचं, यांत्रिक, दिखाऊ सजलेल्या बाजारपेठेसारखं !! हे बघून संवेदनशील मन व्याकूळ झाले नाही तरच नवल !! शेवटी जागे असणाऱ्यांनी म जागते रहो म म्हणून हाळी देत राहणं गरजेचं आहे .

**छाया बेले**
नांदेड.

# सांगवी (सु) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी वरीष्ठ महाविद्यालयास शासनाची मान्यता

अहमदपूर दि.१८(बालाजी कारामुंगीकर)ः सांगवी (सु) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी वरीष्ठ महाविद्यालयास शासनाची मान्यता मिळाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, येथील श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळ मांडुरकी या संस्थेस सांगवी (सु) ता: अहमदपूर याठिकाणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी वरीष्ठ महाविद्यालयास शासनाने नुकतीच अंतिम मान्यता प्रदान केली असल्याचे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष तथा भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके पाटील यांनी सांगितले.



लोहा, राणीसावरगाव आणि अहमदपूर यांच्या मध्यभागी आणि लातूर, नांदेड व परभणी जिल्ह्याच्या सीमेवर असणा-या या सांगवी सु येथे पाचवी ते बारावी पर्यंत जवळपास हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून याठिकाणी वरीष्ठ महाविद्यालयास परवानगी मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या पुढील वरीष्ठ शिक्षणाची सुविधा प्राप्त झाल्याने विद्यार्थी सुखावले आहेत.तेव्हा बी.ए.,बी.कॉम. आणि बी.एस्सीचे प्रवेश सुद्धा चालू शैक्षणिक वर्षापासूनच सुरू होणार असल्याचे गणेश हाके म्हणाले.

## आई-वडीलांची सेवा हीच ईश्वर सेवा

**टी.सी. हरवली आहे**

**रामेश्वर अंगद गोरटे** या नावाची रविंद्रनाथ टागोर विद्यालय, अहमदपूर ता. अहमदपूर जि. लातूर या शाळेची १० वी पासची टी. सी. अहमदपूर ते हिप्परगा कोपदेव प्रवासात दि. १५ जुलै २०२४ रोजी हरवली आहे.

सदरील टी.सी. कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क करावा.
मो. नं. ९४२२६५८४९२

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर नवचेतना व्याख्यान संपन्न




अहमदपूर दि.१८ (प्रतिनिधी) आर्य समाजाचे संस्थापक महर्षी दयानंद सरस्वती यांनी जातीविरहित समाज रचनेची चळवळ संपूर्ण भारतभर सुरू केली. त्या बरोबरच स्वातंत्र्य लढ्यातही आर्य समाजाने बजावलेली कामगिरी ही भरीव व नेत्रदीपक आहे, असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील खालसा महाविद्यालयातील संस्कृतचे विभाग प्रमुख व संस्कृतचे गाढे अभ्यासक डॉ. धर्मेंद्र कुमार शास्त्री यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि संस्कृत विभागाच्या वतीने आयोजित मनवीन शैक्षणिक धोरण नवचेतनाफ कार्यक्रमात उद्घाटक व प्रमुख वक्ते म्हणून डॉ. शास्त्री बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक व समीक्षक प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ.दुर्गादास चौधरी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका डॉ. सुनीता शिंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना डॉ. धर्मेंद्र शास्त्री म्हणाले, की आर्य समाजामुळे भारतीय समाजात शांतता आणि सुख समृद्धीचे वातावरण निर्माण झाले. मराठवाड्यात आर्य समाजाच्या चळवळीचा मोठा प्रभाव असून, हैदराबाद मुक्तिसंग्रामातही आर्य समाजाचे महत्त्वाचे योगदान होते, असे ते यावेळी म्हणाले.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी निराश न होता आठ तास अभ्यास करावा.मोबाइल दूर ठेवावे तसेच टी.व्ही. बंद ठेवावा आणि आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना सुप्रसिद्ध लेखक तथा समीक्षक प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, भारतीय ज्ञानाची परंपरा मोठी असून, या परंपरेतील महर्षी दयानंद सरस्वती आणि त्यांनी स्थापन केलेल्या आर्य समाजाचे योगदान मोठे आहे. महर्षी दयानंद सरस्वती यांच्या म सत्यार्थ प्रकाशफ हा ग्रंथ सामाजिक व व्यावहारिक ज्ञानाने सिद्ध झालेला असून, या ग्रंथात जीवनातील सर्व प्रश्नांची उत्तरे सापडतात. सर्व विद्यार्थ्यांनी या ग्रंथाचे वाचन करावे असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून भारतीय ज्ञान परंपरांचे जतन होईल, असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी महात्मा फुले महाविद्यालयाच्या वतीने काढण्यात आलेल्या म असूडफ वार्षिक विशेषांकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेला साडेतीनशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने हा विशेषांक प्रकाशित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ह. भ.प. डॉ. अनिल महाराज मुंढे यांनी केले. प्रास्ताविक संस्कृत विभाग प्रमुख डॉ. प्रशांत बिरादार यांनी केले तर आभार प्रदर्शन इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. किरण गुट्टे यांनी केले. यावेळी महादेवातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कबीरवाणी

**निंदक नियरे राखिए ,**
**आंगणि कुटि बँधाई,**
**बिन पाणी साबुन बिना,**
**निरमल करे सुभाई..**

**भावार्थ** : संत कबीर म्हणतात कि, निदंकाची घरे ही आपल्या शेजारी बांधुन दिली पाहिजे. कारण निंदक हे निंदा करुन आपला स्वभाव निर्मळ करण्याचे कार्य करतात म्हणुन ते शेजारी असेल पाहिजेत. ज्याप्रमाणे शरीर हे पाणी आणि साबनाने स्वच्छ होते अगदी त्याचप्रमाणे निंदक निंदा करुन आपल्यातील दोष दाखवुन देतात त्यामुळे आपल्यातील दुर्गण दूर होण्यास मदत होते.

यासाठी निंदक जेंव्हा निंदा करतात त्यामुळे आपले दुर्गण आपणास समजतात आणि आपले मन निर्मळ होते. त्यामुळे संत कबीर म्हणतात निंदक निंदा करुन पाणी साबनाविना आपले मन निर्मळ करतात. म्हणुन त्यांचे घर आपल्या शेजारी आपल्या आंगणामध्ये बांधुन दिले पाहिजे.

**डॉ. कारामुंगीकर बालाजी**

# स्वास्थ्य व सौंदर्य रक्षक, नारळातील औषधीय गुण

## आरोग्यम धनसंपदा

नारळा अनेक औषधीय गुण आहेत, स्वास्थ्य व सौंदर्याचे रक्षक म्हणुन नारळ हे बहुगणी आहे.

नारळ हे एक फळ आहे. नारळात अनेक औषधी गुण आहेत. ओल्या नारळामधील गराचा वापर सौंदर्य प्रसाधनामध्येही केला जातो. नारळ पाणी स्वाथ्यासाठी पौष्टीक असते. कार्बोहाइड्रेट, प्रोटीन, मिनरल्स, व्हिटामिन असे सर्व पोषक घटके नारळापासून मिळतात.

जेवणाला पर्याय म्हणूनही तुम्ही खोबरे खाऊ शकतात. नारळात फायबर्स मोठ्याप्रमाणात आढळतात. अपचन, छातीत जळजळीचा त्रास असणाऱ्यांनी नारळाचा गर सेवन केल्यास लाभ होतो.

अनियमित मासिक पाळीचा त्रास असणार्या महिलांनी रोज १० ग्रॅम ओल्या नारळाचा गर खावा. तसेच गायीचे दूधही प्यावे. मासिक पाळी संबंधी सर्व समस्या सुटतील.

शीघ्रपतनाचा त्रास असणाऱ्या पुरूषांनी रोज सुखे खोबरे आणि गायीच्या दूध प्यायल्याने विशेष लाभ होतो.

नारळ पाणी पोटाचे विकार दूर करण्याचे काम करते. अल्सरसारखा आजार बरा होतो. किडनी, थायरॉइड, डायबिटीज व मुत्राशयाचा विकार असलेल्या लोकांनी नारळ पाणी मोठ्याप्रमाणात सेवन करावे.

नारळात अनेक व्हिटॅमीन असतात ते पचनास फार लाभदायी असतात. पोट दूखत असल्यास किंवा गॅस झाल्यास नारळ पाणी प्यावे. नारळ पाण्याने उलटीही थांबते.

नारळ खोकल्यावर एक रामबाण उपाय आहे. नारळाच्या दूधात एक चमचा खसखस आणि एक चमचा मध मिसळून रोज रात्री पिल्याने फायदा होतो.

तोंडात फोड असल्यास



ओले नारळाचा गर खावा आणि जास्तीत जास्त नारळ पाणी प्या.

नारळाचे तेल रोज त्वचेवर लावल्यास त्वचा सतेज होते.


आंबट दही, मुलतानी माती आणि खोबरेल तेल एकत्र करून लावल्यास केस चमकदार होतात.

दररोज दोन-तीन नारळाचे पाणी सेवन केल्यास चेहरा उजळतो.

हिवाळ्यात रोज रात्री सुखे खोबरे खावे. रात्री झोपताना चेहरा, मान आणि त्वचेवर खोबरेल तेल लावून हाताने हळूवार मसाज करावी. सकाळी उठल्यावर पाण्याने चेहरा धुऊन घ्यावा. काही दिवसातच सुरकुत्या नाहीशा होतील. नारळाचा गर चेहऱ्यावर लावल्याने, चेहऱ्यावरील व्रण नाहिसे होतात.

गर्भवती महिलांनी रोज नारळाचा गर खाल्याने त्यांची प्रकृती ठणठणीत राहते. तसेच सुदृढ बाळ जन्माला येते. खोबरेल तेलात बदाम बारिक करून टाकावे. डोके दुखीवर हे तेल रामबाण औषणीचे काम करते.

पोटात जंत झाल्यास रोज सकाळी किसलेले खोबरे खावे.



**आयुर्वेदाचार्य**
**डॉ.प्रवीण बढे**
**पद्मश्री नामांकन २०२४**

# यशवंत धाराशिव जिल्हा

शुक्रवार दि. १९ जुलै २०२४

☎कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com




## धनगर समाजाच्या आंदोलनास रिपाइं (आ) चा पाठिंबा

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देऊन तात्काळ अंमलबजावणी करावी या मागणीसाठी धनगर समाजाच्यावतीने सुरु असलेल्या आमरण उपोषण स्थळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) ने दि.१८ जुलै रोजी जाहीर पाठिंबा दिला आहे.



सकल धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी शामसुंदर तेरकर, कमलाकर राजेंद्र दाणे, राजू मैंदाड व समाधान पडळकर यांचे १५ जुलैपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरु आहे. यावेळी रिपाइंचे जिल्हाध्यक्ष रवि माळाळे, मराठवाडा उपाध्यक्ष पोपट लांडगे, जिल्हा संपर्कप्रमुख विद्यानंद बनसोडे, तुळजापूर तालुकाध्यक्ष बाबासाहेब मस्के, आळणी ग्रापं सदस्य आकाश कदम, कुमार गायकवाड, बंटी रोकडे, संकल्प माळाळे, श्रीकांत गायकवाड उपस्थित होते.

# यंत्रणांनी कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण करून निधी खर्च करावा:पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – जिल्ह्याच्या ग्रामीण आणि शहरी भागाच्या तसेच विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीकडून विविध यंत्रणांना निधी उपलब्ध करून देण्यात येतो. यंत्रणांनी विविध विकास कामे वेळेत आणि गुणवत्तापूर्ण करून निधी खर्च करावा तसेच विविध योजना योजनेच्या लाभार्थ्यांना देखील वेळेतच योजनांचा लाभ द्यावा, असे निर्देश पालकमंत्री प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांनी दि.१८ जुलै रोजी दिले.

जिल्हा नियोजन समितीचे सभा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार सर्वश्री विक्रम काळे, राणाजगजितसिंह पाटील, कैलास पाटील, ज्ञानराज चौगुले, जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, समितीचे विशेष निमंत्रित सदस्य महेंद्र धुरगुडे, नवनाथ जगताप व महेश नलावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत म्हणाले की, नगर पालिका यंत्रणांचे काही वर्षांची कामे आजही अपूर्ण असून ही गंभीर बाब आहे. अपूर्ण कामामुळे नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कामे गुणवत्तापूर्ण होत नसल्याच्या तक्रारी आहे. कामे ही गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असली पाहिजे. ज्या एजन्सीने कामे वेळेत पूर्ण केली नाहीत, त्यांना कारणे दाखवा नोटीस द्यावी. केलेल्या कामांची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी. गाव तेथे स्मशानभूमी हा उपक्रम देशात राबवणारा धाराशिव हा पहिला जिल्हा आहे. स्मशानभूमीसाठी लागणाऱ्या जागेसाठी निधी दिला व अधिकार देखील दिले आहे. तरी देखील ही कामे वेळेत होत नाही ही गंभीर बाब असल्याचे डॉ सावंत यांनी सांगितले. ३ महिन्यांच्या आत स्मशानभूमीची कामे पूर्ण करण्याचे निर्देश देऊन ते म्हणाले की, जर ३ महिन्यांत ही कामे पूर्ण होत नसतील तर संबंधित अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकात याची नोंद घेण्यात यावी. महावितरणने आवश्यक त्या ठिकाणी रोहित्र लावण्याची कामे वेळेच्या आत पूर्ण करावीत. त्यामुळे शेतकऱ्यांना व नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही. आवश्यक तेवढी रोहित्र जिल्ह्यात उपलब्ध असावी. वीज पुरवठ्यात तुटवडा नसावा. जिल्ह्यातील दुष्काळी स्थितीमुळे शेतकऱ्यांना विमा अनुदानाची मिळालेली रक्कम बँकांनी त्यांची खाते गोठून ठेवली आहे. शेतकऱ्यांचे पीक कर्ज बँकांनी अडवू नये. सिबिलमुळे पीक कर्ज देताना बँकांनी शेतकऱ्यांना अडचणी निर्माण करू नये. बँकांनी ज्या शेतकऱ्यांची खाते गोठविली आहेत, ती काढण्यात यावीत असे त्यांनी सांगितले. ज्या राष्ट्रीयकृत बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत आहे, त्या बँकांच्या



शाखांमधून शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांचा निधी व ठेवी काढून घेण्यात याव्यात असे सांगून प्रा.डॉ. सावंत म्हणाले,ज्या बँका शेतकऱ्यांना सिबिलवरून पीक कर्ज देण्यास नकार देत असतील तर त्या बँकेविरुद्ध एफ आय आर दाखल करावा असे त्यांनी सांगितले. तर खा राजेनिंबाळकर यांनी धाराशिव नगर परिषद अंतर्गत २०२० ते २०२३ या कालावधीतील कामे अपूर्ण आणि गुणवत्तापूर्ण नसल्याची बाब यावेळी पालकमंत्र्याच्या निदर्शनास आणून दिली. तसेच धाराशिव शहरातील नागरिकांना या अपूर्ण कामांमुळे अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. ही कामे गुणवत्तापूर्ण व चांगली करण्यात यावी असे त्यांनी सांगितले. तसेच

आमदार राणाजगजिसिंह पाटील यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पुरेसा वीज पुरवठा उपलब्ध झाला पाहिजे तसेच आवश्यक तेवढे रोहित्र जिल्ह्यात उपलब्ध असावे. शेतकऱ्यांना वीज समस्या उद्भवणार नाही याकडे वीज वितरण कंपनीने लक्ष द्यावे असे त्यांनी सांगितले. तर आ काळे यांनी शेतकऱ्यांना बँकांनी वेळेत पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे. सिबिलच्या कारणावरून पीक कर्जासाठी शेतकऱ्यांची अडवणूक केली जाऊ नये असे त्यांनी सांगितले.

यावेळी आ कैलास पाटील व आ चौगुले यांनीसुद्धा विविध विषयांवर चर्चा करून समस्यांची सोडवणूक तातडीने करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

सभेत जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ यावर्षीच्या ३१ मार्च २०२४ अखेरच्या खर्चास मान्यता देण्यात आली. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ३४० कोटी, जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) ७४ कोटी आणि जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी उपयोजना क्षेत्रबाह्य योजना) १ कोटी ९८ लाख अशी एकूण अर्थसंकल्पित तरतूद ४१५ कोटी ९८ लाख रुपये होती. त्यापैकी ४१५ कोटी ९८ लाख रुपये ३१ मार्च २०२४ अखेर खर्च झाला. या खर्चात समितीने मान्यता दिली. तर २०२४-२५ च्या जिल्हा वार्षिक योजनेचा ३० जून अखेर झालेल्या खर्चाचा आढावा घेण्यात आला. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ४०८ कोटी रुपये अर्थसंकल्पित तरतूद असून त्यापैकी ३० जूनपर्यंत ३ कोटी ७ लाख रुपये खर्च करण्यात आले. जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत) ७५ कोटी रुपये व जिल्हा वार्षिक योजना (आदिवासी उपाययोजना क्षेत्रबाह्य योजना) अंतर्गत १३ कोटी रुपये अशी एकूण ४९६ कोटी रुपये अर्थसंकल्पीत तरतूद असून ३० जून अखेर एकूण ६ कोटी ७४ लाख रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांनी दिली. या सभेला विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.काही यंत्रणांच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडून खर्च करण्यात आलेल्या व खर्च करण्यात येणाऱ्या निधीची माहिती दिली.

यावेळी पंढरपूर येथे आषाढी एकादशीनिमित्त आलेल्या १४ लाख २५ हजार वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आरोग्य विभागाने ग्रीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड केल्याबद्दल सभागृहाने पालकमंत्री प्रा.डॉ. सावंत यांच्या अभिनंदनाचा ठराव घेतला. हा देशातील अशा प्रकारचा एकमेक उपक्रम असल्याचे पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत यांनी सांगितले

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी साजरी



परंडा दि.१८ (प्रतिनिधी) – येथे डी .बी.ए. समूहच्यावतीने लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची ५५ पुण्यतिथी दि. १८ जुलै रोजी साजरी करण्यात आली.

परंडा येथील शासकीय विश्रामगृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डी.बी.ए समूह संस्थापक अध्यक्ष दयानंद बनसोडे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टीचे सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, परंडा पोलीस पाटील संजय कदम, खानापूर पोलीस पाटील दिलीप परिहार, ॲड दयानंद धेंडे यांच्या हस्ते लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे दीप धूप प्रज्वलन करून पूजा केली. यावेळी लोकशाहीर साठे यांच्या जीवनावर दयानंद बनसोडे व दत्तात्रय पाटील (लोहारा) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी सलीम शेख (वडनेर) दिव्यांग संघटना जिल्हाध्यक्ष धाराशिव पांडुरंग मिसाळ, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार काँग्रेस पार्टी ओबीसी जिल्हा कार्याध्यक्ष डॉ नवनाथ वाघमोडे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, मनसे नेते कमलाकर खैरे, मनसे तालुका सचिव बाळासाहेब कांबळे, संदिपान कांबळे, धर्मराज नरोटे, छगन चौधरी, नागेश थोरात, बाळासाहेब चतुर, विनोद जाधव, हैवत गायकवाड, महिला लक्ष्मीबाई जाधव, अयोध्या काकडे, आरती बनसोडे, सुषमा बनसोडे, संगीता बनसोडे, संगीत थोरात, सुजाता साळवे आदींसह महिला व नागरिक मोठ्या उपस्थित होते.

## पीक कर्ज टाळणाऱ्या बँकेवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत : खा राजेनिंबाळकर

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – पीक कर्जासाठीची सिबीलची अट काढून टाकावी. तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याचे टाळाटाळ करणाऱ्या बँकांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दि.१८ जुलै रोजी केली. यावेळी आमदार कैलास पाटील व जिल्हाधिकारी, डॉ. सचिन ओम्बासे उपस्थीत होते.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात असलेल्या जिल्हा नियोजन भवन मध्ये आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बोलत होते. यावेळी पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, आ राणाजगजितसिंह पाटील, आ कैलास पाटील, आ ज्ञानराज चौगुले, आ. विक्रम काळे, जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी आदींसह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पुढे बोलताना खा राजेनिंबाळकर म्हणाले की, महाविकास आघाडीचे सरकार अस्तित्वात असताना जिल्हा वार्षिक विकास योजनेतून शहरातील रस्ते दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर



निधी मंजुर करण्यात आला होता. परंतू महायुतीचे सरकार अस्तित्वात आल्यानंतर या निधीस स्थगिती देण्यात आली. त्यामुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. जिल्हा नियोजन समिती मार्फत मोठ्या प्रमाणात निधी मंजुर केला असून ही कामे लवकर व दर्जेदार करावीत अशा सूचना खा. राजेनिंबाळकर दिल्या. तर जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यात चालू असलेल्या कामांच्या ठिकाणी प्रथमत: पाणी पुरवठा विहीरीचे काम हाती घ्यावे. तसेच त्या विहीरीला पाण्याची शाश्र्वती असल्यास पुढील काम हाती घ्यावे असे सांगितले. तर जिल्हा नियोजन समितीतून शेतीसाठी नवीन ट्रान्सफार्मर बसविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी वाटप केला असून या निधीतून वॉरंटी संपलेल्या ट्रान्सफार्मर मोठ्या प्रमाणात खरेदी केल्याची गंभीर बाब समोर आली. वॉरंटी संपलेल्या ट्रान्सफार्मर बसविल्यास ते वारंवार जळण्याचा धोका असल्यामुळे शेतीस सुरळीत वीज पुरवठा होवू शकणार नसल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच बँकांनी त्यांच्या शाखेत स्केल ऑफ फायनन्स बँकाचे कर्ज वाटपाचे उद्दीष्ठ व कर्ज वाटप किती झाले आहे ? याची माहिती शाखेच्या दर्शनी भागात लावावी अशा सुचना त्यांनी दिल्या.

## महाराष्ट्रातील प्राचीन ऐतिहासिक बौद्ध लेण्यावरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत

धाराशिव (प्रतिनिधी) – महाराष्ट्रातील बौद्ध लेण्यावरील अतिक्रमणे तात्काळ काढावीत अशी मागणी भारतीय बौद्ध महासभेसह विविध सामाजिक व राजकीय संघटनेच्या कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांकडे एका निवेदनाद्वारे दि.१८ जुलै रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, भारताची ओळख जगाच्या पाठीवर बुद्धभूमी अशी आहे. तर विविध सरकारी दौऱ्यामध्ये आम्ही बुद्धभूमीचे नागरिक आहोत, असे म्हणून विदेशात बौद्ध धर्माचे प्रतिनिधित्व भारत सरकारमधील परराष्ट्र मंत्री प्रधानमंत्री करत असतात. याचे उदाहरण म्हणजे भारताचे परराष्ट्र मंत्री व प्रधानमंत्री यांची वक्तव्य आपणास माहीतच आहेत. परंतू, प्रत्यक्षात मात्र भारतात व पुरोगामी महाराष्ट्रात प्राचीन ऐतिहासिक बौद्ध लेण्या विविध देवतांच्या नावाखाली गिळंकृत केल्या जात आहेत. तर प्राचीन बौद्ध चैत्य स्तूप लेणी यांचे



विद्रूपीकरण करत असताना आपण सत्ताधारी म्हणून गप्पच असतो, असे दुटप्पी वागणे बरे नव्हे. त्यामुळे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध ऐतिहासिक प्राचीन बौद्ध लेण्या कार्ले-भांजा, कणेरी लेणी, पांडव लेणी, खरोसा लेणी, धाराशिव लेणी, तेर येथील चैत्य, नालासोपारा लेणी आदींसह जवळपास बहुतांश बौद्ध लेण्यावरती अतिक्रमण करण्यात आलेली आहेत. ती अतिक्रमने लवकरात लवकर काढण्यासाठी आदेशित करण्यात यावे. जी राज्यातील बौद्ध धर्मियांच्या अस्मितेचे प्रतीक आहेत. अन्यथा आपले सरकार बौद्ध धर्म व बौद्ध अनुयायी विरोधी असून महाराष्ट्रभर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल याची नोंद घ्यावी, असा इशारा दिला आहे. यावर विजय बनसोडे, सुधाकर माळाळे, सोमनाथ गायकवाड, महादेव भोसले, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, बाबासाहेब घरबूडवे, रघुनाथ गायकवाड, प्रशांत शिंदे, भारतीय बौद्ध महासभेचे तालुका संघटक राजाराम बनसोडे, शशिकांत माने, बाबासाहेब कांबळे, महादेव एडके, बाबासाहेब गायकवाड, संदीप अंकुशराव यांच्या सह्या आहेत.

## दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन बोधचिन्हांचे अनावरण

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – संत चोखामेळा अध्यासन केंद्र व वृंदावन फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने तीर्थक्षेत्र पैठण येथे होणाऱ्या दुसऱ्या संत चोखामेळा साहित्य संमेलन २०२४ च्या बोधचिन्हांचे अनावरण देवशयनी आषाढी एकादशी दिनी मंगलताई वाघ यांच्या हस्ते करण्यात आले.

धाराशिव शहरातील संत मुक्ताबाई आयोजित कार्यक्रमात पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत शेषाद्री डांगे, अजयराव जानराव, साहित्यिक डॉ.रूपेशकुमार जावळे, सतिश कोळगे,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्राचे प्रा. डॉ.महेश्र्वर कळलावे आदी उपस्थित होते. यावेळी संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे संस्थापक सचिन पाटील यांनी दुसरे संत चोखामेळा साहित्य संमेलन, पैठण व बोधचिन्ह संबंधित आपले मत व्यक्त केले. पैठण येथे दि.२८ व २९ सप्टेंबर असे दोन दिवशीय सोयराबाई : संत, कवी आणि माणूस असा मध्यवर्ती आशय घेऊन हे संमेलन होत आहे. हे संमेलन ६ सत्रात होणार असून महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील नामवंतांच्या सहभागी होणार आहेत. या साहित्य संमेलनात परिसंवाद, चर्चासत्र, कवि संमेलन, संत साहित्य प्रदर्शन, उद्बबोधन व संत साहित्याचे देखावे असणार आहेत. या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष म्हणून संत सोयराबाई यांच्या साहित्याचे अभ्यासक, पुणे येथील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा.डॉ. संदीप सांगळे हे आहेत. बोधचिन्ह अनावरण प्रसंगी साहित्यिक बाळ पाटील, ॲड. महारुद्र जाधव, राजेंद्र मोरे, पांडुरंग मते आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कृष्णा तेरकर यांनी तर आभार विजय गायकवाड यांनी मानले.

## धुरगुडे यांची जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीमध्ये मांडले प्रश्न

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य महेंद्र धुरगुडे यांनी चर्चेत सहभागी होऊन विविध प्रश्र्न मांडले. त्या प्रश्र्नाच्या अनुषंगाने पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित यंत्रणेला ते सोडविण्याचे आदेश दि.१८ जुलै रोजी दिले.

या बैठकीसाठी पालकमंत्री प्रा डॉ तानाजीराव सावंत, जिल्हाधिकारी सचिन ओंबासे, खा ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आ राणाजगजितसिंह पाटील, आ कैलास पाटील, आ ज्ञानराज चौगुले, आ. विक्रम काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष, पोलीस अधीक्षक



अतुल कुलकर्णी आदींसह अधिकारी उपस्थित होते. या बैठकीमध्ये धुरगुडे यांनी जिल्ह्यात महावितरण मार्फत २०२४ एम्प्लॉयमेंट टेंडर प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने झाली असून गैरप्रकार झाला आहे. याबाबत तक्रार केली होती. त्यामुळे ही निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. या निविदा प्रक्रियेत सहभागी असणारे अधिकारी, ऑडिट विभागातील कर्मचारी व इतर कर्मचारी यांना निलंबित करण्यात यावे. तसेच जे ठेकेदार चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे निविदा प्रक्रियेत सहभागी होऊन चुकीच्या पद्धतीने पात्र झालेले आहेत. त्यांना काळ्या यादी टाकून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली. यावर पालकमंत्री सावंत यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले. तर मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चालू करण्यात आली आहे. त्या धर्तीवर धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसह सर्व राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखांमध्ये या योजनेचे शून्य बॅलन्सवरती खाते उघडण्यात यावेत अशी मागणी केली. पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित बँकांना आदेश देण्याचे व ही प्रक्रिया चालू करण्याचे मान्य केले. तसेच या योजने अंतर्गत आतापर्यंत जिल्ह्यामधून किती फॉर्म जमा झाले आहेत ? याची माहिती शासनाने कळवावी व जास्तीत जास्त महिलांना या योजनेचा लाभ व्हावा यासाठी तहसिलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांनी लाभार्थ्यांना लागणारी कागदपत्रे लवकरात लवकर देऊन सहकार्य करावे अशी मागणी केली. तर शेतकऱ्यांना पीक कर्ज देताना सिविल स्कोर न तपासता त्यांना तात्काळ पीक कर्ज देण्यात यावे व आजपर्यंत शेतकऱ्यांना किती पीक कर्ज दिली ? याची माहिती द्यावी व कोणत्या बँकांनी शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत पीक कर्ज दिले नाही ? अशा बँकांमध्ये शासनाचे असलेले खाते काढून घेण्यात यावे. त्याचप्रमाणे ज्या बँका शेतकऱ्यांना पीक कर्ज देत नाहीत व लीड बँकेने ठरवून दिलेले उद्दिष्ट पूर्ण करीत नाहीत अशा बँकांवर कारवाई करण्याचे लीड बँक मॅनेजरला आदेशित करावे अशी मागणी करण्यात आली. यावर प्रशासनाच्यावतीने कार्यवाही करू असे आश्र्वासन देण्यात आले.

## रोटरीचे नूतन अध्यक्ष डॉ जिंतूरकर व सचिव कुलकर्णी यांनी स्विकारला पदभार

धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – रोटरी क्लब ऑफ उस्मानाबादचे नूतन अध्यक्ष डॉ श्रीराम जिंतूरकर व सचिव आनंद कुलकर्णी यांनी आपल्या पदाचा पदग्रहण प्रमुख पाहुणे ज्येष्ठ संपादक प्रवीण बर्दापूरकर व असिस्टंट गव्हर्नर अजित गोबारे यांच्या उपस्थितीत दि.१६ जुलै रोजी स्विकारला.

धाराशिव शहरातील पुष्पक मंगल कार्यालयात या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. २०२३-२४ च्या माजी सचिव डॉ मीना जिंतूरकर यांनी गतवर्षीचा अहवाल वाचून दाखविला. तर माजी अध्यक्ष्या डॉ अनार साळूंके यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. त्या दोघींनीही त्यांचा पदभार नूतन अध्यक्ष डॉ जिंतूरकर




व नूतन सचिव कुलकर्णी यांचेकडे सुपूर्त केला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नूतन कार्यकारणी, रोटरी सेवा ट्रस्टचे ट्रस्टी यांचा सत्कार करण्यात आला. रो सुनील गर्जे यांनी यावर्षीचा रोटरी सेवा ट्रस्टचा अहवाल सादर केला. गोबारे यांनी डिस्ट्र गव्हर्नर डॉ साबू यांचा संदेश वाचून दाखवीत उपस्थितांना मार्गदर्शन केले. तर डॉ जिंतूरकर यांनी या वर्षीच्या कामाची रूपरेषा सांगितली. बर्दापूरकर यांनी राजकारणी लोकाकडे पाहोचण्याचा सर्वसामान्य लोकांचा दृष्टिकोन कसा चुकीचा आहे ? यावर भाष्य केले. त्यानी विविध राजकारणी लोकांच्या माजी मुख्यमंत्री स्व विलासराव देशमुख, स्व गोपीनाथ मुंडे, स्व वसंतदादा पाटील व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या आठवणीना उजळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो संजय देशमाने व रो डॉ पल्लवी कोथळकर यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव कुलकर्णी यांनी मानले. या कार्यक्रमास रोटरीचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय

### महागाईची चाहूल

अन्य देशांपेक्षा भारतातील महागाई वाढीचा दर कमी असल्याचा दावा केंद्र सरकार करत होते; मात्र, युरोपीय देशांनी तो दरच नव्हे, तर प्रत्यक्ष किंमतीही कमी केल्या. तसे भारतात घडलेले नाही. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई वाढीचा दर जूनमध्ये ३.३६ टक्के झाल्याचे सरकारने जाहीर केले आहे. गेल्या १६ महिन्यांतील हा उच्चांकी दर आहे. मे महिन्यात हा दर २.६१ टक्के होता. त्यात लक्षणीय वाढ झाली आहे. खाद्यपदार्थ व अन्नधान्य आणि औद्योगिक उत्पादनासाठी आवश्यक असलेला कच्चा माल यांच्या दरात वाढ झाल्याने महागाई वाढीचा दर वाढल्याचे सांगण्यात येत आहे. तिमाहीचा विचार केला तरी चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत घाऊक किंमतीवर आधारित महागाई वाढीचा दर २.३८ टक्के होता. पाच तिमाहींमधील हा उच्चांक आहे. एकूणात महागाई वाढीचा हा दर गेले आठ महिने वाढत आहे. उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाची दरवाढ उत्पादक ग्राहकांवर लादत आहेत, त्यामुळे गाभा' महागाईवाढीचा दर आगामी काही महिने वाढण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. लवकरच सणासुदीचा काळ सुरू होईल. त्यावेळी अन्न-धान्यासह अनेक वस्तूंची मागणी वाढेल तेव्हा चढ्या दराने खरेदी करणे ग्राहकांना भाग पडेल. ज्यांचे उत्पन्न मर्यादित आहे, अशा सामान्य वर्गावर या वाढत्या महागाईचा बोजा पडणार यात शंका नाही. दुर्दैवाने महागाई कमी करण्यासाठी केंद्र सरकार काही उपाय योजत असल्याचे दिसत नाही.

भोजन महागले

ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई वाढीचा दर जूनमध्ये ५.०८ टक्के झाल्याचे नुकतेच जाहीर झाले होते. याचा अर्थ दरवाढीचा कल कायम आहे. घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित अन्न-धान्य व खाद्य पदार्थ या गटाचा महागाईवाढीचा दर जूनमध्ये ८.६८ टक्के झाला. गेल्या २२ महिन्यांतील हा उच्चांक आहे. अन्न-धान्य व खाद्य पदार्थ गटाची एका महिन्यात १९.८ टक्क्याने महागाई वाढली आहे. सर्व सामान्यांच्या रोजच्या भोजनात वापरल्या जाणाऱ्या कांदे व बटाटे यांच्या दरात जूनमध्ये अनुक्रमे ९३.३५ व ६६.३७ टक्के अशी जबर वाढ नोंदवली गेली. त्यापैकी केवळ कांद्याच्या दरात एका महिन्यात ३६.७ टक्क्यांनी वाढ झाली. मे महिन्यात शाकाहारी भोजनाची (थाळी) सरासरी किंमत वाढून ती २७ रुपये ८० पैसे झाल्याचे वृत्त गेल्या महिन्यात आले होते. अर्थात या किंमतीत देशात कोठेही थाळी-मर्यादित भोजन-मिळत नाही. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही वाढ ९ टक्के आहे. गेल्या वर्षी रब्बी हंगामात कांदे व बटाटे यांचे उत्पादन सुमारे १६ टक्क्यांनी कमी झाले होते. हिवाळी पाऊस कमी झाला, असे त्यासाठी कारण दिले जात आहे. त्यांचा पुरवठा अजूनही कमी असल्याने आगामी काही काळ महागाई वाढीचे दोन्ही दर चढे राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या खेरीज तांदूळ, मका, डाळी व कडधान्ये आणि फळे यांचेही दर गेल्या एका महिन्यात वाढल्याचे सरकारने म्हटले आहे. उत्पादित वस्तूंच्या महागाईवाढीच्या दरातही जूनमध्ये वाढ होऊन तो १.४३ टक्के झाला. गेल्या १६ महिन्यांतील हा उच्चांक आहे. अन्न-धान्य व खाद्य पदार्थ आणि ऊर्जा (खनिज तेल, वीज आदी) हे गट वगळता गाभा महागाई वाढी'चा दर देखील पुन्हा वाढण्याची शक्यता आता दिसू लागली आहे. सर्वसाधारणपणे वस्तू व सेवा यांच्या दरातील वाढीस गाभा महागाई वाढ दर मानले जाते. सध्या हा दर ३.१ टक्के आहे. साखर असो किंवा कापड, सर्व वस्तू उत्पादन करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या किंमती वाढत आहेत. उत्पादक ही दरवाढ ग्राहकांपर्यंत पोहाचवत आहेत. त्यामुळे सर्व उत्पादित वस्तूंचे दर वाढत आहेत. गव्हाची किंमत वाढली की त्यापासून तयार होणारी बिस्किटे, ब्रेड या वस्तूंच्या किंमती वाढतात हा रोजचा अनुभव आहे. गेल्या डिसेंबरपासूनच देशात लोकसभा निवडणुकीचे वारे वाहात होते. भारतीय जनता पक्षाला पुन्हा सत्ता मिळवण्यात रस होता. त्यामुळे महागाईकडे केंद्र सरकारचे लक्ष नव्हते. विरोधी पक्षांनी हा मुद्दा प्रचारात उपस्थित केल्यावर भाजपकडून त्यांची खिल्ली उडवली गेली. आता सरकारच्याच आकडेवारीनुसार महागाईचा दर सतत वाढत असल्याचे सिद्ध होत आहे. आगामी मोठ्या महागाई वाढीची ही चाहूल आहे. त्यात होरपळ सामान्य जनतेची होणार हे स्पष्ट आहे.

# बोला पुंडलिकावरदा हरि विठ्ठल...

जगाच्या नकाशात महाराष्ट्र एका टिंबाएवढा दिसत असला तरी महाराष्ट्रातील विठ्ठलाचे आणि वारीचे कौतुक मात्र संपूर्ण जगभरात चालू असते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या ह्या पांडुरंगास आपल्यापर्यंत पुंडलिकाने आणले. आपल्या भारतीय संस्कृतीत फार सुंदर सांगितले आहे की एक सेतू दोन तटांना जोडतो. त्यामुळे जेव्हा कधी तुम्ही ह्या तटावरून त्या तटावर जाल तेव्हा आधी त्या सेतुला नमस्कार करा. कारण त्या सेतुमुळे तो दुसरा तट तुम्ही पाहू शकलात. पुंडलिक सुध्दा अगदी ह्या सेतू प्रमाणे आहे. आपण आणि विठ्ठल ह्यामधील सेतू! म्हणूनच जेव्हा जेव्हा विठ्ठलाच नाव घेतले जाते तेव्हा आधी पुंडलिकाच्या नावाचा गजर केला जातो. वारकरी संप्रदायाच्या संतांनी पुंडलिकाचे आभार मानले आहेत. ह्या पुंडलिक कथेचा विचार केला तर पांडुरंग जेव्हा पुंडलिकाच्या घरी येतो, तेव्हा पुंडलिक आईवडीलांची सेवा करत असतो. तो पांडुरंगाला शेजारची वीट देतो आणि थोड्यावेळ उभं रहायला सांगतो. पांडुरंग त्या वीटेवर समचरणांनी उभा रहातो. पुंडलिकाने केलेली आई वडिलांची सेवा पाहून पांडुरंग प्रसन्न होतो. एक नाही दोन नाही, आज अठ्ठावीस युगे तो पांडुरंग त्या विटेवर उभा आहे. ह्या छोट्या कथेचा सखोल विचार केला तर ही कथा आपल्या विचारांना थक्क करून सोडणारी आहे. वेगवेगळे आयाम आहेत ह्या कथेला. ह्या कथेचे सगळ्यात मोठे सार म्हणजे जो आईवडीलांची मनोभावे सेवा करतो त्याला भगवंत स्वतः घरी येऊन दर्शन देतात.आता दुसऱ्या बाजूने विचार केला तर पुंडलिक इतका सेवेमध्ये मग्न आहे की तो देवाला सुध्दा वाट पहायला लावतो. तात्पर्य, तुमची सेवा प्रामाणिक असेल तर देव सुद्धा तुमच्यासाठी थांबतो. विनोबा म्हणायचे- देवाने कधीच म्हटले नाही की हातचे काम सोडा आणि माझी भक्ती करा. आधी काम मग राम, हेच देवाचे ब्रीद आहे. प्रत्येक संतांनी काम करत देवाची भक्ती केली आहे. देवा इतकंच संतांनी कामाला महत्त्व दिले आहे. संत सावता माळी, गोरा कुंभार, चोखोबा, गाडगेबाबा अशा अनेक संतांनी काम करत भक्ती केली आहे. इथे पांडुरंग सुध्दा पुंडलिकाने वीट दिली म्हणून



चिडला, रागावला नाही. त्याचा इगो' वगैरे दुखावला नाही. आपल्याला जर आपल्यापेक्षा लहान व्यक्तीने उभे केले तर आपला अहंकार लगेच दुखावतो. पण तो विठ्ठल होता. कामाचे, सेवेचे महत्त्व जाणून होता. म्हणूनच कोणतीही तक्रार न करता तो वीटेवर उभा राहिला. खरेतर इथेच पुंडलिकाच्या भक्तीची ताकद कळते. एका छोट्या वीटेवर सम उभे राहून देवाला हेच सांगायचे आहे की आयुष्यात सम रहाता आले पाहिजे. किती छोटी मोठी संकटे आली तरी डगमगून जाऊ नका. सखोल विचार करा. आपण कोणासाठी काम करतोय हे पहा. आधी त्या व्यक्तीची कामाची ताकद ओळखा, प्रामाणिकपणा ओळखा. चांगल्या माणसांना कधीच सोडू नका.

किती कमालीची गोष्ट की अठ्ठावीस युगे तो विठ्ठल उभा आहे. पुंडलिकाची वाट बघत! अशी कोणती सेवा आहे की इतकी युगे लोटली तरी संपली नाही? पुंडलिकाने तर वर मागितला त्यात केवळ विठ्ठलास विनंतीच केली होती की तू इथेच रहा! विठ्ठलही राहिला तिथेच उभा ! याचे कारण म्हणजे ह्या कथेत पुंडलिक सेवेचे प्रतिक आहे.

तो प्रतिनिधित्व करतोय प्रत्येक युगातील सेवाधारी मुलांचं! जोपर्यंत या जगात पुंडलिकासारखी आईवडीलांची सेवा करणारी मुलं आहेत तोपर्यंत विठ्ठल वीटेवर उभा रहाणार आहे. अजून किती युगे उभे रहायचेय हे सुद्धा विठ्ठलास माहित नाही. म्हणूनच वारकरी जेव्हा विठ्ठलाचे दर्शन घेतात तेव्हा त्यांची नजर खाली विठ्ठलाच्या पायावर असते. आधी ते विठ्ठलाचे पाय चेपतात, मग विठोबाच्या पायावर डोके ठेवतात. ही पाय चेपणारी प्रत्येक व्यक्ती पुंडलिक आहे. त्यांना माहित आहे विठ्ठल आपल्यासाठी अजूनही विटेवर उभा आहे. तसेच विठ्ठलही जाणून आहे की या जगात अजूनही खूप पुंडलिक आहेत आणि अजूनही नव्याने जन्म घेणार आहेत. म्हणून तो विठ्ठल विटेवरुन खाली येत नाही.

आपल्या भारतीय संस्कृतीत चांगल्या गोष्टीचे अनुकरण हा सुद्धा एक उत्तम संस्कार मानला जातो. पुंडलिकाने सुध्दा कुकुट मुनींचे अनुकरण केले. तीर्थयात्रा करत असताना कुकुट मुनींच्या आश्रमात पुंडलिकाने पाहिले की तीन अत्यंत कुरुप, विद्रुप स्त्रिया कुकुटमुनींचे दर्शन घ्यायला कुटीत शिरल्या. परंतु जेव्हा त्या बाहेर आल्या तेव्हा त्या पराकोटीच्या सुंदर दिसत होत्या. हा चमत्कार पाहून पुंडलिकाने मोठ्या आश्चर्याने त्या स्त्रियांना विचारले, आपण कोण आहात? तेव्हा त्या म्हणाल्या, आम्ही गंगा यमुना सरस्वती आहोत. तुझ्यासारखे अनेक पातकी, दुष्ट, नतद्रष्ट लोक आमच्या जलात स्नान करून शुद्ध होतात. त्यांचामुळे आम्ही कुरूप होतो, अशुध्द होतो. परंतु कुकुटमुनींचे दर्शन घेतल्यानंतर आम्हाला आमचे मूळ रुप मिळते. पुन्हा पुंडलिकाने आश्चर्याने प्रश्न विचारला अशी काय पुण्याई केली आहे ह्या कुकुटमुनींनी? की ज्यांच्या आशीर्वादाने गंगा सरस्वती शुध्द होतात. तेव्हा त्या नद्या म्हणाल्या, कुकुटमुनींनी मातापित्यांची उत्कट सेवा केली आहे. त्याक्षणी पुंडलिकामध्ये परिवर्तन झाले.

तीर्थयात्रा सोडून पुंडलिक तडक घरी आला आणि त्यांनी अखंड आईवडीलांची सेवा केली. इतकी सेवेत निष्ठा की देव आला भेटीला म्हणून हुरळून न जाता देवालाही त्याने विटेवर उभे केले. अर्थात वीट म्हणजे प्रपंचात आलेला वीट बाहेर काढला, मनातील वासनेची जळमटे पुंडलिकाने अंतःकरणातून बाहेर काढली. आईवडीलांना सोडून तीर्थयात्रा केल्याचा पश्चाताप झाला होता. तो ताप त्याने वीटेवर ठेवला आणि येणाऱ्या प्रत्येक युगाला सेवेचे उत्तम उदाहरण दिले. पैशाने आराम विकत घेता येतो. शांती विकत घेता येत नाही. सेवा सुध्दा भक्तीचे आणि शांतीचे उत्कृष्ट साधन आहे. पुंडलिकाच्या सेवेची परंपरा आजही सुरू आहे हे विठ्ठला सांगायलाच पूर्वी पासून लोक धान्य शेतात पेरून, शेत पावसाच्या हवाली करुन वारीला जातात. चंद्रभागेतीरी येणाऱ्या वारीत शेतीची अवजारे, वाद्य, ग्रंथ, वस्त्र अशा वस्तूंना बाजारपेठ मिळते. संस्कृती, परंपरा, लोककलेची देवाणघेवाण होते. या प्राचीन वारीला ज्ञानेश्वर आणि भावंडांनी एक वेगळा आयाम दिला. वारीचे रूप भव्य दिव्य केले. एकंदीत पांडुरंग आणि पुंडलिक यांच्या पायी श्रद्धा दाखवून आपली संस्कृती आणि परंपरा आजही जोपासण्यासाठी ही वारी निरंतर चालू आहे.

**विचारधन : प्रा. डॉ. प्राची गडकरी**
**संत साहित्याच्या अभ्यासक**

## श्रीमंतांच्या यादीत रतन टाटा का नाहीत?

रतन टाटा यांचे नाव देशातील प्रसिद्ध उद्योगपतींमध्ये येते; पण रतन टाटा यांच्याबद्दल भारतीय लोकांच्या मनात असलेला सन्मान इतर उद्योगपतींना मिळत नाही. जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या फोर्ब्सच्या यादीत त्यांचे नाव नसते. अनेकांना प्रश्न पडतो की, इतका मोठा व्यवसाय असूनदेखील त्यांचे जगातील सर्वात श्रीमंताच्या यादीत नाव का नसते? मुकेश अंबानी आणि गौतम अदानी यांच्यात नेहमीच शर्यत दिसते; पण रतन टाटा या शर्यतीत दिसत नाहीत. रतन टाटा यांना मिळणारा आदर आणि प्रशंसा ते भारतासाठी किती महत्त्वाचे आहेत हे दर्शवते. ते आता टाटा समूहाचे प्रमुख आहेत. त्यांनी आपल्या विलक्षण नेतृत्व क्षमता आणि व्यावसायिक कौशल्याने समूहाला मोठ्या नवीन उंचीवर नेले आहे. टाटा समूहामध्ये अनेक प्रकारच्या कंपन्यांचा समावेश आहे.वेल्थ हुरुन इंडिया रिच लिस्ट' २०२२ नुसार, रतन टाटा यांची एकूण संपत्ती अपेक्षेपेक्षा खूपच कमी आहे. रतन टाटा यांची संपत्ती ३,८०० कोटी रुपये आहे. ते



श्रीमंतांच्या यादीत ४२१ व्या क्रमांकावर आहेत; पण त्यांचा प्रभाव यापेक्षा बऱ्याच उंचीवर दिसतो.

रतन टाटा हे जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींच्या यादीत न येण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे समाजसेवेप्रति असलेले त्यांचे समर्पण.टाटा सन्स ही टाटा समूहाची मुख्य गुंतवणूक होल्डिंग कंपनी आहे. या कंपनीचा सर्वाधिक नफा हा टाटा ट्रस्टला जातो. या ट्रस्टचा उपयोग विविध धर्मादाय कामांसाठी केला जातो. त्यात आरोग्यसेवा, शिक्षण, रोजगार निर्मिती आणि सांस्कृतिक संवर्धन यासारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतात.

रतन टाटा यांच्या संपत्तीचा एक महत्त्वाचा भाग वैयक्तिक लाभाऐवजी या सेवाभावी गोष्टींमध्ये जास्त असतो. यामुळेच ते श्रीमंतांच्या क्रमवारीत नसतात. ते श्रीमंताच्या शर्यतीत नाहीत आणि त्यांना याचा काही फरकदेखील पडत नसेल. श्रीमंतांच्या यादीत मुकेश अंबानी किंवा गौतम अदानीसारख्या दिग्गजांशी स्पर्धा करताना ते कधीच दिसत नाहीत. टाटा कुटुंब नेहमीच सामाजिक मूल्यांना महत्त्व देत आले आहे. त्यांचे योगदान हे सामाजिक मूल्यांसाठी आहे. टाटा समूह हा औदार्य आणि सामाजिक जाणीव असलेल्या नेतृत्वाच्या चिरस्थायी परिणामांचा पुरावा आहे. त्यांच्या प्रभावी देणगी संस्कृतीमुळे टाटा समूह कॉर्पोरेट परोपकाराच्या क्षेत्रात एक नेता म्हणून उदयास आला आहे.

## उपदेशकथाः भगवान

एकाफकिराला एकदा स्वप्न पडले.स्वप्नात तो स्वर्गात गेला. तेथे रस्त्यावर मोठी गर्दी झालेली त्याला दिसली. त्या गर्दीतील एकाला त्याने विचारले, एवढे लोक का जमले आहेत? त्या व्यक्तीने सांगितले, आज भगवानांचा जन्मदिन आहे. ते येथून जाणार आहेत. फकिराला आपल्या भाग्याचा हेवा वाटला. साक्षात भगवानाचे दर्शन घडणार. थोड्या वेळाने एका उमद्या घोड्यावरुन एक राजबिंडा तरुण आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. त्याला पाहून फकिराने विचारले, हेच का ते भगवान? ती



व्यक्ती म्हणाली, नाही हे भगवान नाहीत. हे राम आहेत. त्यांना मानणारे लोक त्यांच्यामागून जात आहेत... याच पद्धतीने येशू, बुद्ध, महावीर...सर्वजण येऊन गेले. भगवानांची वाट पाहता पाहता मध्यरात्र झाली. सारे लोक कंटाळून निघून गेले. आणि त्या निर्मनुष्य रस्त्यावरुन एक म्हातारा एकटाच आला. फकिराने त्याला विचारले, आपणच भगवान? म्हातारा म्हणाला, हो. फकिराने विचारले, मग आपल्यामागून कोणीच कसे येत नाही? डोळ्यात अश्रू आणत तो म्हातारा म्हणाला, सारे राम, महावीर, बुद्ध, येशूबरोबर गेले. जो कोणाबरोबर जात नाही, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो.

## नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते. सोमिलकाने दुसऱ्या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसऱ्या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसऱ्या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसऱ्या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्याम ुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्यावरील कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''दे घोघजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

## राशी भविष्य



१९ जुलै २०२४ (पीएसआय)

मेष : शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम कामामध्ये गुणात्मक फरक पडेल. विरोधकांवर आपल्या कामाचा प्रभाव राहील. दिखावा करण्याची प्रवृत्ती त्यागा. व्यसनापासून दूर रहा.

वृषभ : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम सुख समृध्दीत वाढ. फायद्याचा मार्ग मोठा राहील. आपल्या योजनेप्रमाणे कामे पार पडतील. व्यापारात नवीन संबंध प्रस्तापित होतील. ज्या कामाचा फायदा नाही त्याम ध्ये वेळ घालवू नका.

मिथुन : शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पश्चिम प्रतिष्ठित व्यक्तींच्या ओळखीमुळे फायदा होईल. व्यापारात नवीन संबंध वाढतील. आपल्या वस्तू संभाळा. मुलांच्या बाबतीतील चिंता दूर होईल.

कर्क :शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर योजल्याप्रमाणे कामे होणार नाहीत. वेळेचा अपव्यय होईल. व्यापारात अनोळखी व्यक्तिंवर विश्वास दाखवू नका. परिवारातील सदस्यांबाबत चिंता राहील.

सिंह : शुभ रंग: लाल, शुभ दिशा:दक्षिण स्वकर्तृत्वाने आपल्या समस्या दूर कराल. मनोरंजनाच्या संधी मिळतील. आर्थिक परिस्थिती सुधारेल. कुटुंबात कलह निर्माण होण्याची शक्यता.

कन्या : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: पश्चिम संप क्षेत्रात वाढ होईल. लांबचा प्रवास घडण्याचा योग आहे. जवळील व्यक्तींच्या प्रकृतीची चिंता राहील. व्यापार चांगला चालेल. अडकलेला पैसा मिळेल.

तुळ : शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा: उत्तर धन, संपत्तीच्या व्यवहारात यश मिळण्याचे योग आहेत. मित्र किंवा आप्त यांच्यावर जास्त विश्वास ठेवू नका. अपूर्ण कामे वेळेत पूर्ण करा.

वृश्चिक : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर कामामध्ये मिळालेल्या यशामुळे हुरळून जावू नका. आर्थिक आवक सर्वसामान्य राहील. मुलांच्या रोजगाराबाबत चिंता राहील.

धनु : शुभ रंग: केसरी, शुभ दिशा:उत्तर बौद्धिक अडचणी दूर होतील. अचानक लाभ होऊन प्रसिद्धी मिळेल. कुटुंबात शुभ कार्याचा निर्णय घ्याल. वादविवादापासून दूर रहा. नौकरीमध्ये पदोन्नतीचे योग आहेत.

मकर : शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम स्थावर मालमत्तेवरून वाद होण्याची शक्यता आहे. व्यापारात केलेले व्यवहार नुकसानदायक ठरू शकतील.परिवाराकडून मदतीची अपेक्षा करू नका. सामाजिक कामात मग्न रहाल.

कुंभ : शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:पश्चिम नौकरीमधील परिस्थितीत सुधारणा होईल. मुलांना यश मिळण्याचे योग आहेत. वाचनातील गोडी वाढेल. व्यसनापासून दूर रहा.

मीन : शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण आर्थिक परिस्थिती चांगली राहील. विलासी वृत्तीत वाढ होईल. प्रतिष्ठा वाढेल. साधु संताचा सहवास मिळेल. खाण्यापिण्यावर नियंत्रण ठेवा. कौटुंबिक सुख मिळेल.

१९ जुलैला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्म तारखेवर सुर्य, मंगळ व गुरूचा प्रभाव आहे. तुमच्याकडे उत्साहाचा प्रचंड साठा आहे. आपल्या उत्साहाने तुम्ही इतरांनाही प्रेरणा देता. तुमची बुध्दि तल्लख व आकलनशक्ती उत्तम आहे. कुठल्याही समस्येचा उलगडा तुम्हाला सहजासहजी होतो. कुठलेही काम तुम्ही आत्मविश्वासाने हाती घेता. त्यात अडचणी आल्या तरी तुमचे मनोबल कमी होत नाही. नीतिमूल्यांना तुम्ही महत्व देता. भ्रष्टाचाराची तुम्हाला अत्यंत चीड येते. जीवनात काही आदर्श वा नीतिमूल्ये प्रस्थापित करण्यासाठी तुम्ही प्रयत्नशील असता. इतरांचे सल्लामार्गदर्शन घेण्याची सवय ठेवा. सर्व काही आपल्यालाच कळते अशा भ्रमात राहू नका. स्वाभिमानाचे रूपांतर अहंकारात, गर्विष्ठपणात होऊ देऊ नका. डोकेदुखी, डोळ्यांचे विकार टाळण्यासाठी अतिश्रम, जागरणे, वाचन टाळा. मअफ जीवनसत्व आहारात ठेवा.

कार्यक्षेत्र : प्रशासकीय कार्यपध्दतीला शिस्त लावून कार्यक्षमता उंचावून दाखवणारे व्यवस्थापनाचे अभ्यासक्रम, तुमच्या क्षमतेला अनुकूल ठरतील. औद्योगिक व्यवस्थापन, मनुष्यबळ विकास इ. च्या पदविका हस्तगत केल्यावर खाजगी कंपन्यात वा शासकीय सेवेत आपल्या व्यवस्थापन कौशल्याची चुणूक दाखवता येईल.

प्रसिध्दीच्या झोतात असलेली राजकारण, चित्रपट दूरदर्शन क्षेत्रेही अनुकूल ठरतील.

प्रणयी जीवन : आपला जोडीदार आपल्यासारखा सहृदय, रसिक, दिलदार वृत्तीचा असावा असे तुम्हाला वाटते. आपण जसे समाजात आदर्श प्रस्थापित करण्यासाठी बांधिलकीने कार्य करतो. त्याला त्याने उत्तेजन द्यावे व हातभार लावावा अशीही अपेक्षा असते. संकुचित वृत्तीच्या व्यक्तीपासून तुम्ही दूर रहाता. सुयोग्य जोडीदार जुलै २१ ते ऑगस्ट २१ दरम्यानच्या व्यक्तीत सापडेल.

वर्षफळ : जुन्या प्रकरणांचा व्यासंग कार्यालयीन समस्या सोडवण्यास उपयोगी पडेल. वरिष्ठही सल्ल्यासाठी आमंत्रित करतील. जुलै ऑगस्ट मध्ये उत्कर्षाच्या संधी येतील. प्रशिक्षण घ्या. सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये वडिलधाऱ्यांच्या सेवाशुश्रूषेत वेळ जाईल. डिसेंबर जानेवारी मध्ये नव्या कल्पना प्रत्यक्षात आणू शकाल. मार्च एप्रिल मध्ये प्रवासातील ओळखी प्रीतीभावनेत रुपांतरित होतील. मे जून मध्ये कार्यालयात शिस्तीचा बडगा उभारावा लागेल.

महत्वाचे वर्ष : १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३.

भाग्यरत्न : माणिक

याच तारेखेची व्यक्ती : डॉ. जयंत विष्णू नारळीकर, रॉजर बिन्नी

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




## अमिताभ बच्चन यांनी पत्नी जया बच्चन यांच्यासाठी छत्री धरत घेतला पावसाचा आनंद

मुंबई-मेगास्टार अमिताभ बच्चन आपल्या कुटंबीयांची किती काळजी घेतात हे आपण अनेकवेळा पाहिलं किंवा वाचलं असेल. पत्नी जया बच्चन यांच्याबद्दलही ते भरभरुन बोलतात. ज्येष्ठ अभिनेत्री असलेली जया बच्चन या कडक शिस्तीसाठी ओळखल्या जातात. पत्नीची काळजी घेताना बिग बी यांना अनेक प्रसंगात आपण पाहलियं, मग ते प्रवासात असो, आजारपणात असो की शूटिंगच्या सेटवर असो, बच्चन नेहमी पत्नीसाठीचा आदर व्यक्त करताना दिसतात. अलिकडेच त्यांनी पोस्ट केलेला फोटो खूप काही सांगून जातो. यामध्ये अमिताभ यांनी जया बच्चन यांच्यासाठी छत्री धरली असल्याचं दिसत आहे. मंगळवारी रात्री, बिग बी यांनी त्यांच्या एक्स हँडलवर स्वत:चे आणि जया यांचा एक फोटो पोस्ट केला. याला कॅप्शन देताना त्यांनी लिहिलं, ''... आणि पाऊस दररोज पडतो.. कामाच्या सेटवर देखील.''फोटोत अमिताभ बच्चन पांढरा कुर्ता पायजमा घातलेले दिसत आहेत आणि जया बच्चन यांच्यासाठी छत्री धरून पावसात फिरतानाचा हा क्षण कॅमेऱ्यात टिपला आहे. जया यांच्या हातामध्ये लाडूची प्लेट दिसत आहे. जया आणि अमिताभ यांनी ३ जून १९७३ रोजी लग्न केलं होतं. त्यांना लेखिका श्वेता बच्चन नंदा आणि अभिनेता अभिषेक बच्चन ही दोन मुलं आहेत. त्यांनी 'जंजीर', 'शोले', 'अभिमान', 'मिली', 'चुपके चुपके', 'सिलसिला' आणि 'कभी खुशी कभी गम' यासह अनेक चित्रपटांमध्ये एकत्र काम केलं आहे.

त्यांच्या ब्लॉगमध्ये अमिताभ बच्चन यांनी फोटोंची मालिका शेअर केली आणि हंगामी पावसामुळे नकारात्मक परिणाम झालेल्या लोकांसाठी चिंता व्यक्त केली. त्यांनी लिहिलं, ''आणि दिवसभर पाऊस पडतो.. कामावरही.. पावसात पाण्यातून फिरताना सर्व कलाकारांमध्ये छत्र्या मोठ्या प्रमाणात दिसतात.. आणि त्यापैकी बहुतेकांनी याचा आनंद घेतला आहे. उकाड्यात त्रस्त झाल्यानंतर मिळा-लेला हा थंड शिडकावा एका आशीर्वादाप्रमाणं आहे. उन्हाळ्याचे महिने .. परंतु प्रलंबीत शेतीची कामं याबरोबरच अतिवृष्टीनं विनाश आणि पूरही येतो, निसर्गाची नासधूस होते आणि ज्यांना याचा त्रास सहन करावा लागतो त्या वेदनांना कारणीभूत पाऊसच ठरतो.. दरवर्षी परिस्थितीची पुनरावृत्ती होत राहते.. दु:खद.. असहाय.. हे आहे झालेल्या विध्वंसाचे वर्णन करणे कठीण आहे.. परंतु आम्ही प्रार्थना करतो की सर्व काही बरं व्हावं.''
दरम्यान, अमिताभ बच्चन 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटात दिसले होते. 'कल्की २८९८ एडी' रिलीज झाल्यापासून, चाहते आणि फिल्म इंडस्ट्री त्यांच्या या चित्रपटातील कामगिरीवर आनंद व्यक्त करत आहेत आणि देशभरातील प्रेक्षक चित्रपटातील कलाकार आणि टीमवर कौतुकाचा वर्षाव करत आहेत. नाग अश्विन दिग्दर्शित, 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटात दीपिका पदुकोण, कमल हासन, प्रभास आणि दिशा पटानी यांनीही भूमिका साकारल्या होत्या.




## वर्गात वाचन संस्कार महत्त्वाचे

राज्य सरकारच्या वतीने राज्य अभ्यासक्रम आराखडा जाहीर केल्यानंतर त्यात विविध प्रकरणांचा समावेश करण्यात आलेला आहे. आराखड्यात गुणवत्ता विकासाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या गोष्टी नमूद केल्या आहेत. गुणवत्ता विकासाच्या संदर्भाने शालेय प्रक्रिया अधिक महत्त्वाची असते. त्या प्रकरणाअंतर्गत ज्या गोष्टी नमूद केल्या आहेत, त्यापैकी ग्रंथालयाचा विचार सूचित करण्यात आला आहे. शिक्षणाच्या प्रक्रियेत जितकी अध्ययन, अध्यापन प्रक्रिया महत्त्वाची मानली जाते, तितकेच महत्त्व ग्रंथालयाला आहे हे शाळा व्यवस्थापनाने जाणून घ्यायला हवे. शाळा आणि ग्रंथालय याचे एक अतूट नाते आहे; मात्र अलीकडच्या काळात ग्रंथालयाचे नाते दुरावत चालले आहे. वाचन संस्कृती लोप पावत असताना आणि अनेक सामाजिक प्रश्न डोके वर काढले जात असताना ग्रंथालयाचा विचार अधिक परिणामकारक ठरू शकेल. वर्तमानात शाळांमध्ये वाचन संस्कृती रूजवण्यासाठी फारसे प्रयत्न होत नाहीत हे वास्तवही लक्षात घ्यायला हवे. प्रयत्न करायचे म्हटले तरी अनेक शाळांमध्ये समृद्ध ग्रंथालय नाहीत. अर्थात ग्रंथालय नाहीत असे नाही, कारण बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे निश्चित केलेल्या अनिवार्य सुविधेत ग्रंथालयाला स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे ग्रंथालय देशातील प्रत्येक शाळेला आहेत का? असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर होय असे असते. कारण ग्रंथालय सुविधा असल्याशिवाय शाळांना मान्यता मिळत नाही. मान्यतेसाठी तरी शाळांकडे ग्रंथालयाची सुविधा महत्त्वाची मानली जाते. त्यामुळे ग्रंथालय अनिवार्य आहे आणि ती सुविधा सर्व शाळांकडे उपलब्ध आहे; मात्र केवळ ग्रंथालयाची इमारत आणि केवळ दाखवण्यापुरती पुस्तके म्हणजे ग्रंथालय नाही. ग्रंथालयाचे महत्त्व लक्षात घेऊन त्या सुविधा आणि उपयोजनांकडे पाहायला हवे.
शाळा, महाविद्यालयाचे भूषण काय असेल? असा प्रश्न विचारला गेला तर त्याची उत्तरे निश्चित भिन्न येतील; मात्र तरीसुद्धा शाळा, महाविद्यालयासाठी इमारतीच्या सुविधांपेक्षा अधिक महत्त्वाचे आणि भूषणावह काय असेल, तर तेथील ग्रंथालय. पूर्वी शाळा, महाविद्यालयात कार्यक्रम असेल तर प्रमुख पाहुणे यांना निमंत्रित केले जायचे. प्रमुख पाहुण्यांना शाळा महाविद्यालयात संपूर्ण परिसरात काय काय चांगले आहे ते फिरून दाखवले जात असे. अनेक महाविद्यालयांमध्ये तेथील ग्रंथालय हे अत्यंत देखणे असायचे. तेथेच पाहुण्यांचा अधिकाधिक वेळ जायचा. ग्रंथालय हे शाळा, महाविद्यालयाची उंची दर्शित करायचे. पूर्वी विकास म्हणजे इमारती नाही असे मानले जात होते. शिकण्यासाठी अधिकाधिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठीच्या सुविधा विकासावर अधिकाधिक भर दिला जात असे. मुख्याध्यापक, प्राचार्य एकवेळेस एखादी इमारत कमी बांधतील; पण ग्रंथालय समृद्ध करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करत असायचे. आज अशा विचारांची माणसेदेखील हरवत चालली आहे. आज चांगल्या शाळा, महाविद्यालये म्हणजे केवळ उंच-उंच इमारती अशी व्याख्या झाली आहे. आज शाळा, महाविद्यालयांना ग्रंथालयाची गरज नाही, असे सांगणारी माणसे आपल्या भोवतालमध्ये दिसत आहेत. हे अत्यंत दुर्दैवी आहे.
खरेतर शिक्षण व्यवस्थेशी संबंधित सर्वांनाच शिक्षणाची गुणवत्ता उंचवायची आहे असे सातत्याने बोलले जाते; मात्र त्यासाठी जे विविध उपाय सूचित केले आहेत. राज्य अभ्यासक्रमातही त्याबाबतही काही घटक सूचित केले आहेत. त्यातील एक महत्त्वाचा घटक म्हणून ग्रंथालयाचा विचार केला जातो. राज्य अभ्यासक्रम आराखड्यात देखील शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक म्हणून ग्रंथालयाचा विचार करण्यात आला आहे. विद्यार्थी गुणवत्ता विकासात पुस्तकांचा महत्त्वपूर्ण वाटा असतो. म्हणून विद्यार्थ्यांनी स्वयंप्रेरणेने ज्ञान प्राप्तीसाठी शालेय पाठ्यपुस्तकांबाहेर जात अवांतर पुस्तके वाचायला हवीत अशी अपेक्षा करण्यात आली आहे. मुळात शिक्षणाचा हेतु ज्ञान प्राप्ती हाच असतो. त्या ज्ञान प्राप्तीच्या अनेक वाटा असतात; मात्र ग्रंथालय ही महत्त्वाची ज्ञानवाट आहे हे लक्षात घ्यायला हवे. आज आपले शिक्षण पाठ्यपुस्तक केंद्रित झाले आहे. जणू सारे ज्ञानच पाठ्यपुस्तकात सामावलेले आहे अशी आपली धारणा झाली आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकाच्या बाहेर जाणारी शिक्षणा-ची वाट निर्माण करण्यात आपल्याला अपयश आले आहे, हे वास्तव आहे. मुळात कोणीतरी सांगत आहे म्हणून पुस्तक वाचावे असे नाही, तर शिक्षणातील सहभागी असलेल्या प्रत्येकानेच स्वयंप्रेरणेने ज्ञानाची वाट चालण्याची गरज आहे. आज आपल्या शिक्षणातील कार्यरत विद्यार्थ्यांच्या बरोबर शिक्षकांचे देखील वाचनाचे बोट सुटत चालले आहे. ज्ञानासाठीची भूक शिक्षणातून निर्माण करण्याची वाट निर्माण केली जात नाही. त्यामुळे वाचन संस्कृतीचा प्रवास घडताना दिसत नाही. मुळात विद्यार्थी आज अभ्यास करतात, तो केवळ मार्कासाठी. त्यात कोठे ज्ञानाची साधना आहे असे दिसत नाही. बाजारात पाठ्यपुस्तकापेक्षा परीक्षेसाठी मिळणाऱ्या विविध नोट्स महत्त्वाच्या वाटू लागल्या आहेत. त्यामुळे पाठ्यपुस्तक वाचनाचा प्रयत्न देखील घडत नाही. पाठ्यपुस्तकातील आशयाशी नाते सांगणारी अवांतर पुस्तके वाचली जाण्याची



शक्यता हरवत जाते. परीक्षेला येणारे प्रश्न आणि त्याची रेडीमेड उत्तरे असाच आपला प्रवास घडताना दिसत आहे. त्यामुळे ज्ञानाची वाट काहीशी दुराव-ताना दिसत आहे.
सध्याचे युग माहिती तंत्रज्ञानाचे आहे. त्यामुळे या प्रगतीच्या सुविधांपासून कोणत्याही व्यवस्थेला दूर जाता येणार नाही हे खरेच. त्याकरिता माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करत त्याच्याद्वारे विविध ज्ञान अनुभव घ्यायला हवे आहेत. यासाठी शाळेचे ग्रंथालय समृद्ध आणि वैविध्यपूर्ण पुस्तकांनी समृद्ध असण्याची अपेक्षा करण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालयांकडे केवळ मर्यादित आणि केवळ निकष पूर्ण करणारे पुस्तके नको आहेत. ग्रंथालय नेहमीच समृद्ध असायला हवीत. मुळात साहित्य म्हणून आपण जेव्हा विचार करतो तेव्हा त्यातील सर्व प्रकारच्या पुस्तकांचा ग्रंथालयात समावेश असायला हवा. ही पुस्तके निवडताना बाजारात पुस्तके आहेत म्हणून ती विकत घ्यावी असे नाही तर त्यापलीकडे जाऊन विचार करण्याची गरज असते. मुळात शाळा, महाविद्यालय ज्या परिसरात आहे तो परिसर, तेथील विद्यार्थ्यांची आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थिती, विद्यार्थ्यांची अभिरूची, विद्यार्थ्यांचा वयोगट यांचा विचार करण्याची गरज असते. त्याचबरोबर वाङ्मयीन प्रकारांचा विचार करतो तेव्हा ग्रंथालयात कविता, नाट्य, कथा, बालकथा, बडबडगीते, चित्रनाट्य, माहितीपर, विनोदी, बाल कांदबरी, विज्ञानाशी संबंधित अशा विविध प्रकारच्या पुस्तकांनी ग्रंथालय समृद्ध असायला हवीत. याचे कारण शाळा, महाविद्यालयात सर्व प्रकारच्या बुद्धिमत्तेचे विद्यार्थी असतात. त्याचबरोबर प्रत्येकाची अभिरूची भिन्न असेल, तर त्यांची पुस्तकांच्या विषयाची आवड देखील बदलणार यात शंका नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आरंभी पुस्तके वाचताना त्यांच्या अभिरूचीचे पुस्तके वाचू देण्याचे स्वातंत्र्य देण्याची गरज असते. त्यांनी कोणती पुस्तके वाचावीत म्हणून सक्ती करता कामा नये. आरंभी विद्यार्थ्यांची पावले ग्रंथालयाकडे वळावी, वाचनाचा संस्कार रूजावा असे वाटत असेल, तर त्यांच्या अभिरूचीप्रमाणे पुस्तके वाचनाची संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे. पुस्तके वाचनाची सक्ती केली जाऊ शकत नाही आणि केली गेली तर त्यातून वाचनाचा संस्कार रूजवला जाऊ शकत नाही, हे लक्षात घ्यायला हवे.वाचनाचा प्रवास सुयोग्य दिशेने घडावा असे वाटत असेल तर ग्रंथालयाबरोबर वर्गातील वाचन संस्कारासाठी देखील प्रयत्न होण्याची गरज आहे. वर्गातील भिंती त्यासाठी उपयोगात आणता येतीलही. त्याचबरोबर वाचन समृद्धतेसाठी दोरी-वरचे ग्रंथालय शक्य आहे आणि त्याचवेळी शक्य असेल तिथे वर्गात वाचनपेट्या किंवा वाचन कोपरे विकसित करणे शक्य आहे. वर्गातील हे कोपरे म्हणजे जाता येता विद्यार्थ्यांना पुस्तक वाचनाचे स्वातंत्र्य उपलब्ध करून देण्यास मदत करणारे ठरणार आहेत. मुलांना पुस्तके आवडतात म्हणजे त्यातील चित्रे मुलांना आकर्षित करत असतात. ती पुस्तके मुलांसाठी चित्राच्याद्वारे वाचनाची पाऊलवाट असते. वर्गात जेव्हा असे वाचन कोपरे असतात तेव्हा विद्यार्थी स्वतः हव्या त्या वेळी हवी ती पुस्तके स्वतः चाळत ते वाचू शकतात हे स्वातंत्र्य विद्यार्थ्यांना वाचनाच्या दिशेने घेऊन जाण्यास मदत करत असते. त्यामुळे वाचनाचा विचारच रूजवण्यात हे कोपरे अधिक महत्त्वाची भूमिका बजावू शकतात हे लक्षात घ्यायला हवे. त्याचबरोबर शालेय परिसरात वाचन कट्टे उपलब्ध असावेत. मुळात ग्रंथालयात बसून पुस्तके वाचनास मुले कंटाळू शकतात तेव्हा त्यांना शालेय आवारात हवे तसे बसून, झोपून देखील पुस्तके वाचता यायला हवी. शालेय परिसरात वाचन कट्टे तयार केले तर त्या कट्ट्यावर विद्यार्थी चित्र काढणे, मुक्त लेखन करू शकतील. पुस्तकांसंबंधीचे भावही ते अधोरेखित करतील. त्यामुळे वाचन कट्टे हे वाचन स्वातंत्र्याच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा विचार आहे हे लक्षात घ्यायला हवा. वाचनालयासाठी जागा निश्चित करताना वर्गखोली, मोठा हॉल उपलब्धतेनुसार या सुविधांचा विचार केला जावा. वैविध्यपूर्ण पुस्तके, विविध साहित्य प्रकारातील पुरेशी पुस्तके, साहित्य त्या ग्रंथालयात असावे. वयोगटानुसार, विद्यार्थी संख्येनुसार जागतिक स्तरावरील, भारतीय स्थानिक भाषेतील, अनुवादित पुस्तके उपलब्ध करून दिलेली असावीत. ही पुस्तके ज्ञान, विज्ञान याचबरोबर समृद्ध भारतीय जीवनप्रणाली, ऐतिहासिक, काल्पनिक अशा सर्व विषयांवरच्या पुस्तकांचा समावेश असावा. द्विभाषिक पुस्तकांबरोबरच दिव्यांग विद्यार्थ्यांना श्रवण पुस्तके व विविध साधनस्र-ोत दृष्टीबाधित विद्यार्थ्यांना ब्रेल लिपीतील पुस्तके ग्रंथालयात उपलब्ध असण्याची गरज आहे. खरेतर अलीकडच्या काळात मोठ्या प्रमाणावर विविध ॲपवर श्रवणीय पुस्तके उपलब्ध आहेत. त्यामुळे काम करता करता देखील पुस्तके ऐकण्याची संधी यामुळे मिळत आहे.
शालेय ग्रंथालयाचा प्रभावी वापर आणि वाचन संस्कृतीच्या विकासासाठी पुस्तक परीक्षण, पॉपअप बुक्स, लेखकांशी भेट इत्यादी उपक्रम घेण्याचा विचारही अधोरेखित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी पुस्तके वाचावीत याकरिता शाळा व्यवस्थापनाने किमान शालेय वयात पाठ्यपुस्तकातील लेखक, कवी यांच्या मुल-ाखती शाळांमध्ये आयोजित करता येतील. पाठ्यपुस्तकातील पाठ, कविताची जन्मकथा विद्यार्थ्यांच्या समोर आली तर त्यातून वाचन प्रेरणेचा विचारही रूजला जाऊ शकतो. वाचनास प्रेरणा मिळेल अशा दृष्टीने विविध स्वरूपाच्या उपक्रमाचा विचार शाळांनी करायला हवा. आज शाळांना विद्यार्थी संख्येच्या अभावी ग्रंथपाल उप-लब्ध असण्याची शक्यता नाही.
त्यामुळे शाळा स्तरावरच या समस्येचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. पुस्तकांची देवाणघेवाण, हाताळणी करणे, काळजी घेणे, गरज असेल तेव्हा त्यांची बांधणी करणे या दृष्टीने कृती कार्यक्रम घेण्याची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पुस्तके वाचणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे आणि पुस्तक वाचनाकडे जे विद्यार्थी ओढले गेले नाही त्यांच्यासाठी देखील विविध उपक्रमांची गरज आहे.
त्या दृष्टीने पुस्तकातील आशयाची भित्तीपत्रके, पुस्तक मुखपृष्ठ तयार करणे, प्रश्नमंजूषा, पुस्तकांवर आधारित सादरीकरण यांसारख्या उपक्रमातून वाचन संस्कृतीचा विकास करता येईल. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये जे सुप्त गुण आहेत त्या गुणांना या निमित्ताने प्रोत्साहन मिळणे शक्य होणार आहे. एकीकडे विद्यार्थ्यांच्या वाचनासाठी प्रयत्न होत असताना शिक्षकांच्या वाचनाकडे देखील लक्ष देण्याची वेळ आली आहे. शिकवणारे शिक्षक वाचन करत नसतील तर त्याचा परिणाम म्हणून त्यांच्या अध्यापनात प्रभावीपणा येण्याची शक्यता नाही. शिक्षक वाचनाने समृद्ध असतील शालेय वातावरणाबरोबर संपूर्ण चित्र बदलू शकेल म्हणून शिक्षकांना वाचनासाठी प्रोत्साहन देण्याची नितांत गरज आहे. शेवटी वाचता समाजच समाजाचे स्व-ास्थ उत्तम राखू शकेल.
-ऐसपैस शिक्षण : संदीप वाकचौरे

## यशवंत महाशब्दकोडे



आडवे शब्द
१. व्याकूळ, घाबरलेला
५. असामान्य
८. पान (सं.)
९. दृष्ट
१०. 'पुरी'चे दैवत
१२. मोठा नगारा
१३. नवरदेव
१४. व्याख्यान
१५. रेशमचा किडा
१६. अंदाज, तर्क
१८. राबता, जाणे-येणे
२०. प्रमाणपत्र
२२. मच्छर
२४. स्वाभिमानी स्त्री
२५. पल्लवीने रेणुका शहाणेच्या चित्रपटात साकारलेली भूमिका
२७. धमकी, श्वास
३०. व्यवस्थित
३२. अखबार
३३. कासंडी, दुधाची घागर
३४. हाताचा एक अवयव
३६. व्यवस्था
३८. ऋण, व्याजाने घेतलेली रक्कम
४०. जहाजांचा मुक्काम
४१. फळातील द्रव
४२. हाताने सूत काढून हातमागावर विणलेले कापड
४३. पंगत
४५. दरोडा
४७. अपशकुन
५०. नकला करणारा
५२. हिशोबाची एक बाजू
५४. यात्रेत नियमित जाणारा
५६. दुधाच्या वड्या
५८. शेजारी शेजारी
६०. झकास
६१. एक मंगलवाद्य
६३. निवासस्थान
६४. समोरसमोरची चकमक
६५. पूर्णपणे
६७. एक सुगंधी वनस्पती
६८. समुद्र
७०. रमणीय
७१. असुर, दानव, देवांचा शत्रू
७२. गाजावाजा
७३. किंमत, पैसा
७४. विशेष
७५. चंद्र
७६. निकट, जवळ
७८. भूकंप
८०. मलई
८१. फरक
८२. घराणे
८३. रंग बदलणारा प्राणी

उभे शब्द
१. यजमानीण
२. पहारेकरी
३. कलंक
४. सुकुमार
५. न थांबता
६. धैर्य
७. दारूचा एक प्रकार
८. उद्याच्या नंतरचा दिवस
११. गर्दीचा विळखा
१३. भावाची पत्नी
१५. कृत्रिम शीतपे (इंग्रजी) उन्हाळ्यात या कंपन्यांमध्ये शीतयुद्ध रंगते!
१७. धार्मिक पर्यटन
१८. महिला, बाई
१९. प्रफुल्लित
२१. पटपट, वेळ न दवडता
२३. मानसिक धक्का (हिंदी)
२६. वस्तूचा छोटा तुकडा
२८. समोरच्याच्या मनातील विचार आ-ेळखणारा
२९. वार्ताहर
३०. पाणी
३१. आई-वडील
३३. सूत काढण्याचे एक साधन
३५. आरोळी, ललकारी
३७. जिव्हा
३९. मळलेले
४०. आपला नसलेला
४४. अरण्य
४६. अंजन
४८. चेष्टेखोर
४९. न वापरलेली, नवी
५१. दुलई
५३. चौसोपी वाड्यातील मधली खोली
५५. लेखणी
५६. भिऊन पळ काढणारा
५७. भटकणारा
५९. आशीर्वाद
६१. माळ, हार
६२. नुकतेच आगमन झालेला, नवखा
६४. तुलनेतील सारखेपणा
६५. अनुत्तीर्ण
६७. चर्चा
६८. लाकडाची उत्कृष्ट जात
६९. रानरेडा
७०. सुंदर तरुणी
७३. दरवाजा
७४. मृत्तिकापात्र
७५. सुविधा
७७. मगज
७८. द्रव्य
७९. बीजगणितात आढळणारा श्रीकृष्णाचा मामा

कोडे क्र.६ चे उत्तर
आडवे उत्तर
१.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२.वर्तमानपत्र ३३.चरवी ३४.मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा
उभे उत्तर-१.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९.मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

# रसूल पठाण यांचे पुस्तक पुणे विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात



**उदगीर (प्रतिनिधी)** तालुक्यातील एकुर्का रोड येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कार्यरत असलेले रसूल दा. पठाण यांचे पुस्तक पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठात एम. ए. (मराठी) च्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे.

रसूल दा. पठाण यांचे बालकथा स्वरूप व व्याप्ती हे पुस्तक एम. ए. मराठी द्वितीय वर्षाचे विद्यार्थी संदर्भ ग्रंथ म्हणून अभ्यासणार आहेत. रसूल पठाण यांची एकूण चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. उदगीर येथील अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे कार्यवाह म्हणून सक्रिय असून अनेक सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. उदगीरच्या मातीतील साहित्यिक असलेले रसूल पठाण यांचे पुस्तक नामांकित सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाल्याबद्दल संस्थासचिव प्राचार्य प्रमोद चौधरी, मसापचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य रामचंद्र तिरूके, पर्यवेक्षक सिद्धार्थ बोडके, संस्थासदस्य प्रा. एम. व्ही. स्वामी, साहित्यिक विलास सिंदगीकर, मुख्याध्यापक चंद्रपाल पाटील, संजय ऐलवाड, प्रा. रामदास केदार, दयानंद बिरादार, अनिता यलमटे, अंबादास केदार, लक्ष्मण बेंबडे, प्रा. बिभीषण मद्देवाड, निता मोरे, विक्रम हलकीकर, सिध्दार्थ सुर्यवंशी आदींनी अभिनंदन केले आहे.

# संजीव अण्णा खुळे यांचा सत्कार



**उदगीर (प्रतिनिधी)** मंगरूळ ता. जळकोट येथिल ज्ञानवर्धिनी विदयालयाचे लिपिक संजीव अण्णा खुळे सेवानिवृत्त झाल्याबद्दल मित्र परिवारांच्यावतिने सत्कार करण्यात आला यावेळी पापा पाटील, दत्तात्रय आमगे, आशोक सोमवंशी, श्रीमंत चव्हाण आदीच्यावतिने सत्कार करण्यात आला. यावेळी मित्र परिवार उपस्थित होते.

## टी.सी हरवली आहे

माझी वाघमारे साक्षी गोविंद या नावाची संजीवनी कनिष्ठ महाविद्यालय चापोली ची बारावी पासची टी. सी. लातूर - अहमदपूर या बसने प्रवास करताना हरवली आहे. सापडल्यास संपर्क साधावा - मो. क्र. ९७६७३८१५९५

## टी.सी हरवली आहे

माझी सुरज विद्यासागर हणमंते या नावाची इ. १२ वी विज्ञान पासची टि.सी दि. ०५/०५/२०२४ रोजी उदगीर ते लातूर बस प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधवा. मो.नं. ९५६१७६६७५८

## टी.सी हरवली आहे

माझी विष्णु ज्ञानेश्वर यलमटे या नावाची इ. १० वी नापासची टि.सी दि. ०६/०६/२०२४ रोजी उदगीर ते लातूर बस प्रवासात हरवली आहे. जर कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधवा. मो.नं. ९३७०७०९४२३

## जाहीर प्रकटन
## उदगीर येथील तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३९/२०२३ निशाणी क्रमांक ०७

०१. साकेरा बेगम भ्र. मोहम्मद पाशा कालावाले,
वय ४२ वर्षे धंदा-घरकाम
०२. मोहम्मद इस्माईल पिता मोहम्मद पाशा कालावाले,
वय -१७ वर्षे, धंदा- शिक्षण,
०३. उबेद पिता मोहम्मद पाशा कालावाले,
वय -१६ वर्षे, धंदा- शिक्षण,
०४. मोहम्मद इब्राहिम पिता मोहम्मद पाशा कालावाले,
वय -१३ वर्षे, धंदा- शिक्षण,
०५. उमेरा पिता मोहम्मद पाशा कालावाले,
वय -११ वर्षे, धंदा- शिक्षण,
सर्व रा. खलील मेडीकल जवळ, चौबारा रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर
अर्जदार

**विरुध्द**

शेख हुमेरा बेगम पिता मोहम्मद पाशा
वय २० वर्षे धंदा- शिक्षण

सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार ०१. साकेरा बेगम भ्र. मोहम्मद पाशा कालावाले, वय ४२ वर्षे धंदा-घरकाम ०२. मोहम्मद इस्माईल पिता मोहम्मद पाशा कालावाले, वय -१७ वर्षे, अज्ञान ०३. उबेद पिता मोहम्मद पाशा कालावाले, वय -१६ वर्षे, अज्ञान ०४. मोहम्मद इब्राहिम पिता मोहम्मद पाशा कालावाले, वय -१३ वर्षे, अज्ञान ०५. उमेरा पिता मोहम्मद पाशा कालावाले, वय -११ वर्षे, अज्ञान सर्व रा. खलील मेडीकल जवळ, चौबारा रोड, उदगीर ता.उदगीर जि.लातूर यांनी श्री. डी.ए.साबणे, विधिज्ञ, उदगीर यांच्यामार्फत अर्जदार क्रमांक १ यांचा अज्ञान मुलगा अर्जदार क्रमांक २ ते ४ व अज्ञान मुलगी अर्जदार क्रमांक ५ यांची मौजे यानकी-मानकी रोड, उदगीर जि.लातूर येथील ताब्यात असलेला.

१) भुखंड ५, एम.सी.बेअरिंग क्र. ४-१-२७२४ एडीएम ज्याची चर्तुसिमा
पुर्व पश्चिम दक्षिण बाजू ३२ फुट,
पुर्व पश्चिम उत्तर बाजू ३३ फुट,
आणि दक्षिण उत्तर पूर्व बाजु ३८.६ फुट
जमीनीपासून व बाहेर सर्वे क्र. ३१२/६ येनकी मानकी रोड उदगीर येथे आहे.

२) एम.सी. बेअरिंग क्र. २-३-१२७/५ adm.
पुर्व पश्चिम दक्षिण बाजू १४.७ फुट,
पुर्व पश्चिम उत्तर बाजू १४.१० फुट,
दक्षिण उत्तर पूर्व बाजू २५.५ फुट,
दक्षिण उत्तर पश्चिम बाजु २५.९ फुट
मोमीन गल्ली, उदगीर ता.उदगीर जि.लातूर

वरील चतुःसिमेच्या आलीम जमीन /मालमत्ता विक्रीची परवानगी मिळावी म्हणून या मान्यवर न्यायालयात वरील प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, कोणास सदरहू अर्जदाराच्या अर्जासंबंधी काही उजर/हरकत/आक्षेप असतील तर त्यांनी आपली उजर/हरकत/आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रकाशित झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत लेखी स्वरुपात स्वतः अथवा विधीज्ञांमार्फत सादर करावेत. मुदतीनंतर प्राप्त होणारे उजर/हरकत/आक्षेप ग्राहय धरले जाणार नाहीत., यांची नोंद घ्यावी. तद्नंतर अर्जदाराची बाजू ऐकून घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

पुढील नेमलेली तारीख ०६/०८/२०२४

आज दिनांक १८.०७.२०२२ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

(ए.वाय.देशमुख) प्र. अधिक्षक
कनिष्ठ लिपिक जिल्हा न्यायालय-१, उदगीर
तदर्थ जिल्हा न्यायालय-१, उदगीर

# विकास काळे यांना राज्यस्तरीय राष्ट्रपिता म. गांधी व्यसनमुक्ती सेवा सन्मान पुरस्कार



**जळकोट (प्रतिनिधी)** व्यसनमुक्ती परिषदेच्या वतीने देण्यात येणारा राष्ट्रपिता महात्मा गांधी व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार विकास काळे यांना देऊन गुणगौरव करण्यात आला आहे. हा पुरस्कार राज्यस्तरावर दिला जातो. पुरस्कार वितरण सोहळा ता. ९ जुलै रोजी राजधानी मुंबई येथील वाय बी एम हॉल येथे संपन्न झाला आहे.

व्यसनमुक्ती परिषदेच्या प्रदेशाध्यक्ष अंजलीताई पाटील यांनी पुरस्काराची घोषणा मुंबईतून केली आहे. विकास काळे यांनी व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. राज्यात व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था तसेच साधन व्यक्ती विषयतज्ञ व्यसनमुक्ती सेवा क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्ती संस्था समुपदेशक यांच्या गौरव व कार्याला गती मिळावी व व्यसनमुक्ती चळवळ महाराष्ट्रात नव्हे तर देशात बळकट व्हावी , या उद्देशाने हे पुरस्कार देऊन गुणगौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाला व्यसनमुक्ती परिषदेचे सचिव प्रा. अजिनाथ शेरकर, प्रदेशाध्यक्ष प्रा. अंजलीताई पाटील, कार्यक्रमाचे उद्घाटक विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य चंदन पाटील, व्यसनमुक्ती परिषदेचे कार्याध्यक्ष शिरीष वडजे पाटील, पुरस्कार निवड अधिकारी डॉ. राजकुमार गवळे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट ) जिल्हाध्यक्ष संजय शेटे, बसवराज पाटील नागराळकर आदी उपस्थित होते.

## तहसिलदार कार्यालय, देवणी

(शाखा दंडणीय )

जा.क्र. २०२४/एमएजी/कावि दि.१२/०७/२०२४

**जाहीरनामा**

ज्याअर्थी श्रीमती मालनबी महेबूबसाब शेख रा. देवणी ता.देवणी जि.लातूर यांचा जन्म स्वगृही दिनांक. २९/१२/१९८९ रोजी झाला असुन जन्म नोंदवहीला त्यांच्या जन्माची नोंद नगर पंचायत देवणी ता.देवणी जि.लातूर यांच्या रजिस्टरला नोंद करण्यात आलेली नाही. सदरील श्रीमती मालनबी महेबूबसाब शेख रा. देवणी ता.देवणी जि.लातूर यांचा जन्म स्वगृही दिनांक. २९/१२/१९८९ रोजीची जन्म नोंद नोंदवहीला घेणेबाबत संबधितास आदेशीत करणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी श्रीमती मालनबी महेबूबसाब शेख रा. देवणी ता.देवणी जि.लातूर यांचा दिनांक. २९/१२/१९८९ रोजी झाले बाबत कोणास आक्षेप असेल तर हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिण्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपले म्हणने दाखल करावे. सदरील मुदतीत कोणी म्हणणे दाखल केले नाही तर न्यायालय सदरहु श्रीमती मालनबी महेबूबसाब शेख रा. देवणी ता.देवणी जि.लातूर यांची नोंद नगर पंचायत देवणी ता.देवणी जि.लातूर येथे जन्म-मृत्यु नोंदवहीला घेणेबाबत संबंधितास आदेशीत करण्यात येईल.

आज दिनांक १२/०७/२०२४ रोजी दिले
पुढे नेमलेली तारीख १०/०९/२०२४

तालुका दंडाधिकारी
तथा तहसीलदार देवणी

## जाहिरनामा
## दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवणी यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१०१/२०२४ निशाणी क्र.

अर्जदार सरुबाई भ्र. शिवराज बेलुरे व इतर ज्यापेक्षा अर्जदाराचे पती नामे शिवराज भ्र. विरशेट्टी बेलुरे हे दिनांक २३/०१/२०२४ रोजी मौजे देवणी ता.देवणी जि.लातूर या ठिकाणी मयत झाले असुन ते मौजे देवणी, ता.देवणी जि.लातूर येथील रहिवाशी होते. त्यांचे वारसदार खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १) | सरुबाई भ्र. शिवराज बेलुरे | ६३ | पत्नी |
| २) | अनिल पि. शिवराज बेलुरे | ४६ | मुलगा |
| ३) | संतोष पि. शिवराज बेलुरे | २७ | मुलगा |

अर्जदार सरुबाई भ्र. शिवराज बेलुरे व ईतर यांनी या कोर्टात सदरहु मयताचे Heirship certifcate/ वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य करकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांनी हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे Heirship certificate / वारस प्रमाणपत्र देईल.

सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १६/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याशिनी दिले आहे.

पुढील नेमलेली तारीख : २०/०८/२०२४

आदेशावरुन

(एस.वाय चाउस) शिक्का (पी.एम. नाईकवाडे)
क.लिपिक (सहा.अधिक्षक)

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५१८/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Somnath s/o. Tanaji Mhetre हे R/o. Madlapur Tq.Udgir Dist.Latur दिनांक १५/०४/२०२४ रोजी At. Madlapur Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Vijyabai w/o. Tanaji Mhetre, Age 48, Occu- H.H.
R/o. Banshelki Tq.Udgir dist.Latur
यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Vijyabai w/o. Tanaji Mhetre | 48 | Mother |

अर्जदार याने Somnath s/o. Tanaji Mhetre या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Somnath s/o. Tanaji Mhetre यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः १८/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २७/०८/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) (एल.एम. सुत्राळे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
२ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर

## वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

**मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५२२/२०२४ निशाणी क्रमांक ०७

ज्याअर्थी नामे Uddhav S/o. Satwaji Bodke हे R/o. Udgir Tq.Udgir Dist.Latur दिनांक २३/०६/२०२४ रोजी At. Udgir Tq.Udgir Dist.latur येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार
1) Kusum W/o. Uddhav Bodke, Age 65, Occu- H.H.
2) Amol S/o. Uddhav Bodke, Age 42, Occu- Service
R/o. Killa Galli, Udgir Tq.Udgir Dist.Latur
3) Anand S/o. Uddhav Bodke, Age 37, Occu- Service
4) Aashwin S/o. Uddhav Bodke, Age 35, Occu- Service
5) Aakash S/o. Uddhav Bodke, Age 33, Occu- Service
यांनी खालील नमूद ५ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून

| Sr.No. | Name of Legal Heirs | Age | Relation of deceased |
|---|---|---|---|
| 1) | Kusum W/o. Uddhav Bodke | 65 | Wife |
| 2) | Amol S/o. Uddhav Bodke | 42 | Son |
| 3) | Anand S/o. Uddhav Bodke | 37 | Son |
| 4) | Aashwin S/o. Uddhav Bodke | 35 | Son |
| 5) | Aakash S/o. Uddhav Bodke | 33 | Son |

अर्जदार याने Uddhav S/o. Satwaji Bodke या नावांचे त्यांना मयताचे वारस प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार आहे त्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे. त्या अर्थी सदरहू वारसदार सदरहू मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी हया जाहिरनाम्याचे तारखे पासुन एक महिन्याच्या आत हया न्यायालयात हजार होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचे हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरह Uddhav S/o. Satwaji Bodke यानचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.
आज दिनांकः १६/०७/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
प्रकरणाची पुढील नेमलेली तारीखः २७/०८/२०२४

आदेशावरुन

(के.डी.सुर्यवंशी) (एल.एम. सुत्राळे)
कनिष्ठ लिपिक सहा.अधिक्षक,
२ रे सहदिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर सहदिवणी न्यायलय क.स्तर, उदगीर


## उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो






## उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर

उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|
| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया | | |

मराठवाडयात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड)<br>डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार<br>४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव







# मन्याड व गोदावरी खोऱ्यातील राष्ट्रभक्तीचा स्फूर्तिदायी उपक्रमाची मानव्य विकास विद्यालयातून सुरुवात

देगलूर (प्रतिनीधी):- भारत हा देश जय जवान! जय किसान,जय विज्ञानावर आधारीत असून देशाच्या जडणघडणीत तिघेही महत्त्वाचे असून त्यात देशाचे रक्षण करणारा सीमेवर तैनात जवान देशासाठी सुरक्षाकवच मानला जातो.म्हणतात ना ऐ मातृभूमी तेरे।चरणों पे सिर नमाऊं। मैं भक्ती भेट अपनी। तेरे शरण में लाऊं ।। माथे पे तू हैं चंदन। छाती पे तू हैं माला ।। जिव्हा पे गीत तेरा। मैं तेरा नाम गाऊं।। हे काव्य जेंव्हा म्हणले जाते तेव्हा आपल्या सर्वांच्या रोमा-रोमात वीर रस संचारुन आपल्या सैनिकांच्या शौर्याचे गोडवे अखिल भारत खंडात दुमदुमले जाते. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येकजण आपल्या परिवार गुरफटून जगतो आहे.पण रक्षाबंधन सणाच्या निमित्त बहिण आपल्या भावाला राखी बांधण्यासाठी माहेरी जाते.प्रत्येक कुटूंबात हा सण-उत्सव घराघरात साजरा होतो. पण भारतीय वीर सैनिक आपल्या कुटूंबा पासून कोसो दुर राहून भारत मातेची सेवा डोळ्यात तेल घालून करतो. कुटूंबातील भगींनींची राखी बांधुन घेण्यापासून वंचित राहतो. म्हणून कंधार येथील सुंदर अक्षर कार्यशाळेंनी मन्याड व गोदावरी खोऱ्यातील शालेय भगींनींचे



३३३३ सदिच्छापत्रे व ३३३३ राख्या अन् सोबत १५ फुटी महाराखी गेली १० दहा वर्षापासून अखंडित देशभक्तीचा उपक्रम मन्याड व गोदावरी खोऱ्यातील शालेय भगींनीच्या समर्थ हस्ते पत्र लिहून भारतीय सैनिकांना सीमेवर पाठविण्यात येते.यंदा मानव्य विकास विद्यालय देगलूर या ज्ञानालयात सुंदर अक्षर कार्यशाळा कंधारचा स्फूर्तिदायक उपक्रमास न भूतो न भविष्यती असा प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात देगलूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक मा. विश्र्वनाथराव झुंजारे यांची प्रमुख उपस्थिती होती.शाळेचे मुख्याध्यापक व पोलीस निरीक्षक झुंजारे यांच्या हस्ते सदिच्छापत्राचे विमोचन करण्यात केले. शाळेच्या वतीने उपस्थितांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात मन्याड व गोदावरी खोऱ्यातील स्फूर्तिदायक उपक्रमाचे मार्गदर्शक,ज्येष्ठ पत्रकार आणि शिवाजी कॉलेज शिवाजीनगर कंधारचे माजी शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. गंगाधर तोगरे यांनी देशभक्तीच्या उपक्रमाची ओळख सांगत यंदा मानव्य विकास विद्यालय देगलूर या शाळेची निवड गुणवत्तापूर्ण सातत्य असल्यामुळेच निवड केली आहे असे सांगितले. राष्ट्रकूट कालीन कंधारचा उपक्रम चालुक्यकालीन देगलूर नगरीत राबवून हा ऐतिहासिक उपक्रम बनला आहे.आपल्या गावात घरीच राहून देशभक्ती कशी जपल्या जाते,याचे उत्तम उदाहरण सुंदर अक्षर कार्यशाळेचे सुलेखनकार दत्तात्रय एमेकर गुरुजी,(ग्रंथपाल-श्री शिवाजी हायस्कूल हु.माणिकराव काळे रोड कंधार );यांच्या या स्फूर्तिदायक उपक्रमातुन दिसते.या प्रसंगी पत्रकार राजेश्र्वर कांबळे यांची उपस्थिती होती.यानंतर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथील जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालयात हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास मानव्य विकास विद्यालय चे मुख्याध्यापक संतोष कोल्हे,पर्यवेक्षक शरद हांद्रे,श्याम कोल्हे,शिक्षक प्रतिनीधी संजय कल्याणी आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मन्याड व गोदावरी खोऱ्यातील देशभक्तीच्या स्फूर्तिदायक उपक्रमात ३०० शालेय विद्यार्थ्यांनीनी सहभाग होण्याचा मनोदय व्यक्त केला.या कार्यक्रमात डॉ.गंगाधरराव तोगरे यांनी शाळेचा गुणगौरव करतांना मानव्य विकास विद्यालय देगलूरची निवड केली. जिल्हाधिकारी नांदेड येथे कार्यक्रम करुन भारतीय डाक विभागामार्फत सीमेकडे रक्षाबंधन सणाचे सदिच्छापत्र व राख्या आणि १५ फुटाची महाराखी रवाना होईल.देगलूर पोलिस ठाण्याचे सुनिल पत्रे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवानंद स्वामी यांनी केले.

# घरोघरी जावून भरून घेतले जात आहेत मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचे अर्ज

लातूर, / प्रतिनिधी : जिल्ह्यातील प्रत्येक पात्र महिलेला मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन विविध उपक्रम राबविले जात आहेत. या योजनेसाठी घरोघरी जावून महिलांचे अर्ज भरून घेण्याचा उपक्रम उदगीर नगरपालिकेने हाती घेतला असून त्यामुळे महिलांमधून समाधान व्यक्त होत आहे.



राज्य शासनाने २१ ते ६५ वर्षे वयोगटातील पात्र महिलांना मुख्यमंत्री- माझी लाडकी बहीण योजनेतून दरमहा १ हजार ५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक असून ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा ग्राम ते शहर स्तरावर निःशुल्क उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच पात्र महिलांचे ऑफलाईन अर्ज स्वीकारून ते ऑनलाईन नोंदविण्याची कार्यवाही प्रशासकीय स्तरावरून करण्यात येत आहे. अंगणवाडी, ग्रामपंचायत, शहरी भागातील विविध केंद्रांमध्ये ऑफलाईन अर्ज आणि आवश्यक कागदपत्रे स्वीकारली जात आहेत.

उदगीर नगरपालिकेने या योजनेसाठी महिलांचे ऑफलाईन अर्ज संकलित करण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत नगरपालिकेचे १८ कर लिपीक शहरातील विविध भागात जावून महिलांना योजनेची माहिती देत आहेत. तसेच त्यांच्याकडून ऑफलाईन अर्ज भरून घेत आहेत. या अर्जांच्या आधारे संबंधित महिलांचे अर्ज ऑनलाईन भरण्याची कार्यवाही केली जाणार आहे, अशी माहिती नगरपालिका मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी दिली. या योजनेसाठी अर्ज भरण्याची सुविधा निःशुल्क असून यासाठी कोणतीही फी जाणार नसल्याचे त्यांनी सांगितले.



# हरिजवळगा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना बॅग व शैक्षणिक साहित्य वाटप

**प्रशांत तांबोळकर**

निलंगा : मौजे हरिजवळगा ता. निलंगा जिल्हा लातूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व स्कूल बॅग वाटप करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, इंडियन ऑयल कॉर्पोरेट च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपून येथील इयत्ता १ ली ते ५ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना स्कूल बॅग व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी गावातील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्रीरंग हाडोळे,जेष्ठ संपादक मोहन क्षिरसागर शाळेचे मुख्याध्यापक कलबोने बी एस,पत्रकार मिलिंद कांबळे, ग्रामपंचायत कार्यालयाचे ग्रामसेवक देशमुख, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर हाडोळे,उपाध्यक्ष विनोद मुगळे यांच्यासह शाळेतील शिक्षक वृंद त्यात श्रीमती वाघमारे सी.पी ,श्रीमती कोकणे एम.आय,श्रीमती बेळकिरे ए.एच ,श्रीमती पतंगे आर. एच, श्रीमती नाटकरे एस.पी यांच्यासह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

# ज्ञानेश्वरी समजवून घ्यायला प्रथम माणूस कळला पाहिजे

**लातूर /प्रतिनिधी-** महाराष्ट्राला वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा आहे. हा वारकरी संप्रदाय सहिष्णु, नम्र, लीन आहे. त्याच्याकडे सर्वांना सामावून घेण्याची क्षमता आहे. तेथे जातीचा, धर्माचा किंवा स्त्री-पुरुषाचा असा कोणताही भेदभाव नाही. कारण या वारकरी संप्रदायाचे प्रेरणास्थान असले. भगवद्गीता व ज्ञानेश्वरीत जीवनाचे उद्दिष्ट सांगितले आहे. परंतु, ज्ञानेश्वरी समजवून घ्यायची असेल, तर प्रथम माणूस कळला पाहिजे. वारकरी संप्रदाय हे चांगल्या जीवनाचे दर्शन आहे, असे प्रतिपादन ह.भ.प. भगवतीताई दांडेकर यांनी केले.

विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारत व श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समितीच्या वतीने आषाढी वारीचे औचित्य साधून विश्वशांती गुरुकुल, वाखरीतळ येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रवचनात ह.भ.प. भगवतीताई दांडेकर बोलत होत्या. या प्रसंगी विश्वशांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे, भारतचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. विश्वनाथ दा. कराड, श्री. काशीराम दा. कराड, श्री. तुळशीराम दा. कराड, माजी मंत्री उल्हास पवार, डॉ. संजय उपाध्ये, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, प्रा. स्वाती कराड-चाटे, सौ. उषा विश्वनाथ कराड आणि डॉ. सुदाम महाराज पानेगांवकर आदी मान्यवर उपस्थित होते.

भगवतीताई दांडेकर म्हणाल्या, वारीमुळे देहाची, मनाची, हृदयाची स्वच्छता तर होतेच, त्याचबरोबर वारीतील सर्वसमावेशकता जीवनाचा खरा अर्थ उलगडून सांगते. म्हणून आयुष्यात एकदा तरी वारीला जायला हवे. परमात्मा पांडुरंग, ज्ञानेश्वर ही माऊलीची रुपे आहेत. माऊली म्हणजे आई, जी सर्व सोपे करुन सांगते. सर्वांवर जीवापाड प्रेम करते. जिच्या कुशीत विसावले की आराम मिळतो. माणूस हा चुका करणारा, संत हा कमी चुका करणारा, तर ईश्वर हा एकही चूक न करणारा आहे.



# शाळा व्यवस्थापन अध्यक्षपदी देवशट्टवार यांची निवड

**प्रशांत तांबोळकर**

शिरूर अनंतपाळ : शहरातील भोजराज नगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या अध्यक्षपदी शिरूर अनंतपाळ शहरातील प्रतिष्ठित व्यापारी सुरेंद्र देवशट्टवार तर सदस्यपदी सचिन बेंबळगे, इनायतुल्ला मौजण, खंडू लोहार, संगमनेर सांगवे यांची सर्वानुमते निवड झाली असता त्यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व जनता विकास मंचचे संस्थापक सचिव सुचित लासूणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या वेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष व्यकंट हांद्राळे,कॉंग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष सोमेश्र्वर तोंडारे, उदय बावगे, संभाजी पारशटे, प्रसाद शिवणे, आसिफ उजेडे, विशाल गिलचे यांची उपस्थिती होती.या निवडीबद्दल त्यांचे शाळेचे मुख्याध्यापक कुमार संभाळे, सहशिक्षक देविदास सांगवे, काशिनाथ उंबरगे यांची उपस्थितीथी होती तसेच या वेळी शैक्षणिक क्षेत्रातील तज्ञ म्हणून सेवानिवृत्त शिक्षक उमाकांत देवंगरे गुरूजी यांची निवड करण्यात आली या वेळी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते.

## पान १ वरून

### योजनांच्या...

शासकीय केंद्रावर भरले जाणारे अर्जच पडताळणीसाठी ग्राह्य धरले जातील अशा सूचना देण्यात याव्यात. अधिकृत अशा केंद्रावरच अर्ज भरले जातील असे प्रयत्न केले जावेत. खासगीरित्या आणि अन्य कुठल्यापद्धतीने कुणी अर्ज भरत असतील त्यांना वेळीच रोखण्यात यावे अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीत दिल्या.

### १०० आणा...

नेते आणि उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांना उद्देशून दिल्याचं बोललं जात आहे. योगी आदित्यनाथ आणि केशव प्रसाद मौर्य यांच्यामध्ये मागच्या काही दिवसांपासून मतभेद उफाळून आले आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर अखिलेश यादव यांनी या वादावर खोचक टिप्पणी करत दिलेली ही ऑफर उत्तर प्रदेशच्या राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर उत्तर प्रदेशमधील भाजपामध्ये सारं काही आलबेल नसल्याचे संकेत मिळत होते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या भाजपच्या प्रदेश कार्यकारिणीच्या बैठकीत उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य यांनी केलेल्या विधानानंतर भाजपमधील मतभेद उघडपणे समोर आले होते. पक्ष संघटना ही सरकारपेक्षा मोठी असते. संघटनेपेक्षा मोठं कुणीच नाही. प्रत्येक कार्यकर्ता हा आमचा गौरव आहे, असं विधान मौर्य यांनी केलं होतं, तेव्हापासून भाजपामधील हा सत्तासंघर्ष उघडपणे समोर आला आहे.

### जपानने बनविला...

जिवंत त्वचेची हालचाल करण्यात यशस्वी झालो आहोत.

स्मित हास्य करणा-या रोबोट्सची निर्मिती ही जैविक आणि कृत्रिम यंत्रणा एकत्रित करण्यासाठी गेल्या दहा वर्षांपासून सुरू असलेल्या संशोधनाचा परिणाम आहे. जिवंत त्वचा वापरण्याचे फायदे आहेत. धातू आणि प्लास्टिकच्या तुलनेने जिवंत त्वचा वापरणे ऊर्जा कार्यक्षमतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल तसेच काही बिघाड किंवा नुकसान झाल्यास स्वत:ची दुरुस्ती करण्याची क्षमताही या त्वचेमध्ये असते.

पुढच्या टप्प्यात, संशोधकांचे लक्ष प्रयोगशाळेत तयार केलेल्या या त्वचेमध्ये रक्तप्रवाह आणि स्नायुंचे जाळे निर्माण करण्याकडे आहे. यामुळे त्वचेवर लावण्यात येणा-या सौंदर्य प्रसाधनांची आणि औषधांची अधिक सुरक्षित चाचणी घेणे शक्य होईल. तसेच, रोबोट्सना अधिक वास्तववादी आणि उपयुक्त बनवण्यासाठी याचा फायदा होऊ शकतो.

### छत्रपती संभाजीनगर...

तळमजल्यावर विद्यमान इमारतीमध्ये विद्युतपुरवठा व इतर मूलभूत सुविधांसह १२० फूट आकाराची जागा मागितली आहे.

मिळणा-या जागेत ३ बाय ४ फूट आकाराचा काँक्रीटचा खांब जमिनीच्या खाली सुमारे १० फूट बांधला जाईल. त्याच्या वरच्या बाजूला सेन्सर्स असतील. टेरेसवर सौर पॅनेल बसविण्यात येतील. जागा देण्याचे निश्र्चित झाल्यानंतर एनएससीचे पथक पाहणी करतील. त्यात भूकंपाची माहिती देणारी महागडे उपकरणे असतील. त्यासाठी सुरक्षाव्यवस्था देण्यात येईल. त्या देखभालीचा खर्च एनएनसी उचलेल.

### अग्नीवीरांना १०...

पोलिस भरती आणि खाण रक्षक भरतीमध्ये १० टक्के आरक्षण देण्याची घोषणा केली आहे. तसेच, राज्यातील गट क आणि ड भरतीमध्ये वयात ३ वर्षांची सवलत देण्याचा, याशिवाय गट क भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण दिले जाणार आहे. यासोबतच कोणत्याही अग्निवीर जवानाला स्वत:चा व्यवसाय सुरू करायचा असेल तर त्याला व्यवसाय सुरू करण्यासाठी ५ लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे.



आज औसा मतदार संघातील औसा, आशिव, बेलकुंड या गावातील नागरिकांना भेट दिली व त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा करण्यात आली.

## चौकशीची जाहीर नोटीस

रिव्हीजन अर्ज क्रं:-४४/२०२४
कलम:७० ए

जा.क्र. दि.२०१२/२०२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांकः
**गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कवळखेड ता.उदगीर जि. लातूर नोंदणी क्रमांक:एफ-१२७३७ (लातूर)**
अर्जदार- श्री बाबूराव शंकरराव राठोड
विरुद्ध
गैरअर्जदार- श्री बाळासाहेब नारायण राठोड, व इतर-०८

सदरील अर्जातील गैरअर्जदार क्रमांक (०५) सौ रेखा वामन चव्हाण, रा. मल्लापूर ता. उदगीर जि. लातूर यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी धर्मादाय सह आयुक्त, लातूर या कार्यालयात रिव्हीजन अर्ज क्रमांक ४४/२०२४ कलम-७० ए अन्वये अर्ज दाखल केले असून त्यामध्ये आपण अनुक्रमे गैरअर्जदार क्रमांक:०५ आहात व ०५ आहात व नि.क्रं. १३ खाली जाहीर नोटीसद्वारे आपणास कळविणे बाबत मा. धर्मादाय सह आयुक्त, लातूर विभाग लातूर यांचे दि.२८/०६/२०२४ रोजी आदेश झाले आहेत. सदर प्रकरणामध्ये पुढील तारीख २२/०७/२०२४ रोजी नेमलेली आहे.

तरी आपण दि.२२/०७/२०२४ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता मा. धर्मादाय सह आयुक्त, दिवाणजी कॉम्प्लेक्स, अंबाजोगाई रोड, लातूर ता. व जि. लातूर यांचे समक्ष कार्यालयात स्वतः वा वकिलामार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे उजर/कैफीयत दाखल करावेत अन्यथा आपली काही हरकत नाही असे समजुन वरील अर्जातील चौकशी पुर्ण केली जाईल व अर्ज निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील.

ही नोटीस मा. धर्मादाय सह आयुक्त, लातूर विभाग, लातूर यांच्या शिक्क्यानिशी व माझ्या सहीनिशी आज दि.१६/०७/२०२४ रोजी दिली.

**न्या. लिपीक**

**आदेशावरुन,**
**अधिक्षक (न्याय)**
**सार्वजनिक न्यास**
**नोंदणी कार्यालय, लातूर**
**विभाग, लातूर**

## टी.सी. हरवली आहे

मनियार अजुंम सलीमसाहेब या नावाची, सुशिला देवी ज्यु. कॉलेज या महाविद्यालयाची इयत्ता १२ वी पास टी.सी.व सनद तसेच १० वी चा मार्कमेमो व सनद व इतर महत्वाचे कागदपत्रे प्रकाश नगर ते ५ नंबर ॲटो प्रवासादरम्यान हरवली आहे. कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

**मोबा-८८५६८९९११०**


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

**प्रो. योगेश कुमार**
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26


# आषाढी एकादशीनिमित्त स्वामी दयानंद विद्यालयात आषाढी दिंडी



लातूर / प्रतिनिधी- जेएसपीएम संचलित स्वामी दयानंद विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त बालवाडी ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा परिधान करून टाळ मृदंगाच्या व विठ्ठल नामाच्या गजरात स्वामी दयानंद विद्यालयापासून राजीव नगर परिसरापर्यंत दिंडी काढून विठ्ठलाचे नामस्मरण केले आणि सहभागी वारकरी विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

या दिंडीमध्ये विठ्ठलाच्या भूमिकेत शिवराज, गजानन, विक्रांत हे होते तर रुक्मिणी च्या भूमिकेत अक्षरा, सिध्दी या विद्यार्थीनीने सुंदर वेशभूषा करून रूक्मिणीची भूमिका यशस्वीपणे साकारली. यावेळी मुख्याध्यापिका सुनिता मुचाटे, माध्यमिक विभागाचे प्रमोद मोकाशे, देशमुख, आक्कलदिवे सर, सरवदे मॅडम, मस्के, अंबेसंगे, बिरंगल, देशमुख मॅडम यांच्यासह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

९% आवर्त ठेव द.सा.द.शे, 0.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.

यशवंत
शुक्रवार दि. १९ जुलै २०२४



उदगीर
पान ८
कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०
email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.
शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

उपलब्ध सुविधा
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# प्रामाणिकपणे कष्ट केल्यास यश मिळतेच - ना. मंत्री संजय बनसोडे



**उदगीर (प्रतिनिधी)** ग्रामीण भागातील विद्यार्थी घडवण्याचे कार्य गेल्या ३५ वर्षापासून गंगाधरराव साकोळकर पाटील विद्यालयाच्या माध्यामातून होत आहे. विविध क्षेत्रात आपल्या विद्यालयाचे विद्यार्थी कार्यरत आ-हेत. विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा विभागामार्फत विविध उपक्रम राबवून खेळाडूंना न्याय देण्याचा प्रयत्न केला असून आज आपल्या भागातील खेळाडूंसाठी क्रीडांगणावरील २०० मी.चा धावणपथाचे भुमीपुजन केले असुन यामुळे या भागातील खेळाडुंना फक्रायदा होईल कुठल्याही क्षेत्रात यश मिळवायचे असेल तर प्रामाणिकपणे कष्ट केल्यावरच आपणास यश मिळते असे मत राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते देवर्जन ता.उदगीर येथील गंगाधरराव साकोळकर पाटील प्राथमिक माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालयाच्या वतीने आयोजीत शाळेच्या क्रीडांगणावरील २०० मी.चा धावणपथच्या भुमिपुजनाप्रसंगी बोलत होते.

यावेळी संस्थाअध्यक्ष शिवाजीराव पाटील, संस्था सचिव ओम प्रकाश साकोळकर, माजी सभापती सिद्धेश्वर पाटील, तहसीलदार राम बोरगावकर, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, डॉ. सुलभा पाटील, सौ. करुणा पाटील, उमेश पाटील, वसंत पाटील, बसवराज रोडगे, शंकर रोडगे, व्ही.एस. कुलकर्णी, युवराज धोतरे, सरपंच अभिजित साकोळकर, नजीर हाशमी, पृथ्वीराज शिवशिवे, समद शेख, ईश्वर खटके, दयानंद रोडगे, गंगापुरचे सरपंच भुषण बिरादार, शेकापुरचे सरपंच विठ्ठल शेळगे, भाकसखेड्याचे लिंबाजी खेडकर, विवेक जाधव, सुमठाणचे शाहुराज किंवडे, राम बिरादार, अनिल रोडगे, नारायण रोडगे, प्राचार्य शिरुरे, मुख्याध्यापिका रंजना लद्दे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, उदगीर मतदार संघामध्ये हजारो कोटींची विकास कामे चालु असुन आपण विविध शासकीय कार्यालये जिल्ह्याच्या दृष्टीने उभारले आहे. आता आपल्या उदगीरचा विकास जिल्ह्याच्या धर्तीवर केला असुन जिल्ह्याच्या दृष्टीने आपण पहिले पाऊल टाकत प्रादेशिक परिवहन कार्यालय मंजूर केले आहे. त्याचा नंबर ही आपणास एम.एच.५५ मिळाला असुन आता महाराष्ट्रात उदगीरची एक नवी ओळख निर्माण झाली आहे. तर ९५ वे अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या माध्यमातुन उदगीरची ओळख जगामध्ये गेली असुन मागील काळात विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धा आयोजीत करुन या भागातील नागरिकांना एक बौध्दीक मेजवानी दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना यश मिळवायचे असेल तर आपले ध्येय ठरवुन त्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सकारात्मक ठेवुन तशीच कृती केल्यास जीवनात यशस्वी होता येते असे सांगून. आपल्या विद्यालयात इनडोअर स्टेडियम उभारावे जेणे करुन ग्रामीण भागातील विद्यार्थी देशपातळीवर आपल्या भागाचे नाव करतील असा विश्वास ना.बनसोडे यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अनिता येलमटे यांनी केले तर आभार पर्यवेक्षक दिलीप कांबळे यांनी मानले. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# नवनीत पब्लिकेशन्स तर्फे लाल बहादूर शास्त्रीच्या विद्यार्थ्यास मोबाईल टॅबचे बक्षीस वितरण



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३म२४ साठी दहावीच्या विद्यार्थ्यांना नवनीतअपेक्षित वरती स्टडी पर्क बक्षीस योजना जाहीर केली होती .या बक्षीस योजनेत संपूर्ण महाराष्ट्रातून विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यात लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालय उदगीर येथील विद्यार्थी चैतन्य श्याम निडेबने हा सहभागी होऊन बक्षीसपात्र ठरल्यामुळे त्याला मोबाईल टॅब बक्षीस मिळाले. मुख्याध्यापक अनंतराम कोपले, क्रीडाशिक्षक संतोष कोले, नवनीत पब्लिकेशनचे व्यवस्थापक राजकुमार डबरे , प्रतिनिधि एकनाथ येलगट्टे यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करून विद्यार्थ्याला पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या यशस्वी विद्यार्थ्याचे स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, कार्यवाह शंकरराव लासुणे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे यांसहीत सर्वांनी अभिनंदन केले.

# भाजपा युवा मोर्चाचे मतदान नोंदणी अभियान



**उदगीर (प्रतिनिधी)**आज भाजपा युवा मोर्चा उदगीर शहराकडून नविन मतदार नोंदणी करण्यात आले. भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोलभैया निडवदे यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शक भाजपा शहरध्यक्ष मनोज दादा पुदाले, सरचिटणीस आंनद बुंदे, युवा मोर्चा शहरध्यक्ष रामेश्वर चांडेश्वरे यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजपा शहर उपाध्यक्ष अमर सूर्यवंशी, भाजपा नेते अशोक वाकुडे यांच्या प्रमुख उपस्थितीत नोंदणी करण्यात आली.

या नविन मतदार नोंदणीचे आयोजक भाजपा युवा मोर्चाचे शहरउपाध्यक्ष साई वाघमोडे यानी आयोजन केले होते. यावेळी युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष कृष्णा वाडकर,युवा मोर्चा चिटणीस सुनिल फक्रपाळ, युवा वारियर्स शाखा अध्यक्ष ओमकार सुकते, शिवम बावगे, नवनाथ गुरखेल, रामेश्वर पास्तामोड आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.



आषाढी एकादशीनिमित्य दुधिया हनुमान मंदिर येथे बालाजी बिरादार, सौरभ चव्हाण मित्र मंडळाच्या वतीने भाविक भक्तांना फराळाचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रितम विरशेट्टे, दिनेश पवार,सचिन पवार, ॠषिकेश घाटे, शंतनु मोरे,निखील पाटील,पवन बिरादार,समिर बागबंदे, अमर बागबंदे, निलेश बिरादार, प्रवीण रेड्डी , शशांक कुलकर्णी,आनंद बिरादार, संदीप देवकत्ते, ॠषिकेश कुलकर्णी, शैलेश लोंढे, राहुल बिरादार, रामेश्वर कोटलवार, बालाजी चिगळे, ॠषिकेश जगळपुरे ,पवन ऐनिले, प्रेम पवार, नितीन पवार, कुलदिप पवार, रोहित मोतीपवळे इतर मित्र परिवार .

# सैनिकी विद्यालयाचा माजी विद्यार्थी शुभम वाईकर याची असिस्टंट कमांडर पदी निवड

**उदगीर (प्रतिनिधी)** श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयातील माजी विद्यार्थी शुभम शेषेराव वाईकर याची असिस्टंट कमांडर पदी निवड झाली आहे.

शुभम वाईकर हा विद्यार्थी सैनिकी विद्यालयातून २०१२ मध्ये दहावी उत्तीर्ण झाला होता. केंद्रीय लोकसेवा आयोग यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या सी ए पी एफक्र अंतर्गत केंद्रीय राखीव पोलीस दलात असिस्टंट कमांडर पदी शुभम वाईकर याची निवड झाली आहे. युपीएससी मार्फक्रत या पदावर नियुक्त होणारा अंधआदिवासी समाजातील हा पहिलाच विद्यार्थी आहे.



शुभम वाईकर याची असिस्टंट कमांडर पदी निवड झाल्याबद्दल त्याचे वडील शेषेराव वाईकर यांचा सत्कार सैनिकी विद्यालयात प्राचार्य वसंत कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आला.यावेळी पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, संतोष चामले, विलास शिंदे, प्रा. नितीन पाटील, प्रा. प्रदीप कोठारे, एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड हे उपस्थित होते.

शुभमने तिसऱ्या प्रयत्नात हे यश संपादन केले असून ऑल इंडिया २८० वा रँक त्याने पटकावला त्याबद्दल त्याचे व त्याच्या आई वडिलांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे शरदचंद्र पवार गटाचे सरचिटणीस बसवराज म. पाटील नागराळकर ,उपाध्यक्ष चंदन पाटील नागराळकर ,शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप पाटील नागराळकर ,सहसचिव चेतनपाटीलनागराळकर, प्राचार्य वसंत कुलकर्णी ,पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के ,विभाग प्रमुख प्रा. प्रदीप कोठारे, सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# तोंडार व शिवालय उदगीर ते भक्तीस्थळ पालखी दिंडी सोहळा प्रारंभ







**उदगीर (प्रतिनिधी)** तोंडार व शिवालय बिदर रोड उदगीर ते भक्तीस्थळ पालखी दिंडी सोहळयास प्रारंभ झाला असुन ही पालखी दिंडी गुरुपोर्णिमा रविवार दि. २१ जुलै रोजी भक्तीस्थळ राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज सजीवन समाधी स्थळ येथे समारोप होणार आहे.

तोंडार येथुन प्रतिवर्षी राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज गुरुमाउली यांच्या अशिर्वादाने शि.भ.प. रतिकांत महाराज तोंडारकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रसंत गुरु भक्तांच्या भक्ती भवनेने गुरुपौर्णिमेनिमित्त तोंडार व शिवालय बिदर रोड उदगीर परिसर ते भक्तीस्थळ पालखी दिंडीचे हे २५ वे वर्ष असुन गुरुवार दि. १८ जुलै रोजी अशोक स्वामी व सौ. उमादेवी स्वामी यांच्या बिदर रोडवरील शिवालय निवासस्थान येथुन दिंडीस प्रारंभ झाला. प्रारंभी गुरुराज महाराज यांच्या हस्ते पालखीचे व राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या तैलचित्राचे विधिवत पुजन करण्यात आले. यावेळी उध्दव महाराज हैबतपुरे, विरशैव समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे किर्तन केसरी शिवराज नावंदे गुरुजी, चंद्रकांत हैबतपुरे, षण्मुख मठपती, सुशिल जीवणे, उमादेवी स्वामी, अशोक स्वामी,दत्ता खंकरे, रतिकांत स्वामी, उमाकांत शेटे, ,निळकंठराव बिरादार,बस्वराज बंळे, चंद्रकांत हैबतपुरे, विरभद्र तोंडचिरे, शिवप्रसाद कोरे, नागनाथ स्वामी, नागेश्वर झुंगा स्वामी, विश्वनाथ गंगथडे, बस्वराज करंजे, आनंद सोनटक्के, पमताई कोडगावे ,शेषाबाई हिंगणे, माया भेदे, विरम्मा कोडगावे, कळसे ताई, सौ.छाया बागबंदे, सौ. आठाणे,सौ.रुपाताईबिरादार ,श्रीमती सिरसे, सौ.टाकळे यांच्यासह उदगीर शहर व परिसरातील १२ महिला भजनी मंडळ सहभागी झाले होते.

यावेळी विविध मान्यवरानी मनोगत व्यक्त केले. व आरती होवून पालखी दिंडीस प्रारंभ झाला. ही दिंडी छत्रपती शिवाजी महाराज चौक, महात्मा बसवेश्वर पुतळा नगर परिषद, हावगीस्वामी मठ, ते संत शिरोमणी मन्मथ स्वामी मंदिर, महात्मा बसवेश्वर कॉलनी सोमनाथपुर शोभायात्रा काढण्यात आली. ही पालखी दिंडी तोंडार येथे मुक्काम १९ रोजी तोंडारपाटी, इस्मालपुर, वाढवणा, हंडरगुळी येथे शोभायात्रा व मुक्काम २० रोजी सायंकाळी ८ वाजता राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे सहजीवनसमाधीभक्तीस्थळ अहमदपूर येथे समारोप व २१ रोजी गुरुपोर्णिमा निमित्त आयोजित उत्सवात सहभाग नोंदवणार आहेत.